७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०५२ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## आसाममध्ये हायवेवर लँडिंगचा थरार...

मुंबई (दै. संध्या) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज आसाममधील रण नैतिक दृष्टीकोणातून अत्यंत महत्वाच्या असलेल्या मोरान बायबास इमर्जन्सी लँडिंग फॅसिलीटीवर आपलं an IAF C-130J Super Hercules विमान लँड करून एक मोठा संदेश दिला आहे. आसाममधील दिब्रुघार बायपासवरील आपत्कालीन लँडिंग फॅसिलिटी ही भारताच्या रणनैतिक इन्फ्रास्ट्रक्चरचा एक महत्वाचा भाग आहे. नॅशनल हायवे १२७ वरील हा ४.२ किलोमीटरचा भाग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लँडिंगवेळी वापरण्यात आला. या हायवेचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्तेच उद्घाटन करण्यात आलं आहे. त्याचबरोबर राफेल आणि सुखोई सू ३० एमकेआई फायटर जेट यांनी देखील या हायवेवर आपली कर्तबगारी दाखवली. त्यांनी हा सामान्य हायवे काही मिनिटातच एका उच्च लष्करी कवायतीमध्ये रूपांतरित केला. इमर्जन्सी लँडिग फॅसिलिटी अर्थात ELF हा एक पर्यायी रनवे असतो. हा थेट हायवेवर तयार करण्यात आलेली एक व्यवस्था असते.

### ढिंग-टांग




# सपकाळांना लाज वाटली पाहिजे

**नागपूर (दै. संध्या)**

■ टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी केल्याने खळबळ : त्यांनी माफी मागावी- देवेंद्र फडणवीस



काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रमाणेच टिपू सुलतान यांनाही मान दिला गेला पाहिजे असे वादग्रस्त विधान केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, त्यांना लाज वाटली पाहिजे. टिपू सुलतानसारख्या नराधमाची तुलना छत्रपती शिवरायांशी करण्याचे जे काम त्यांनी केले आहे ते अतिशय निंदनीय असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य तयार केले. मुघलांच्या जोखडातून सामान्य जनतेला मुक्त करण्याचे काम केले. खऱ्या अर्थाने सामान्य रयतेचे राज्य तयार करणारे छत्रपती शिवराय होते. आणि त्याचवेळी हजारो लाखो हिंदूंची हत्या टिपू सुलतान याने केली. या दोघांची तुलना करून दोघांना सारखे सन्मान द्या म्हणणे यापेक्षा जास्त लांगूलचालन, जोडे चाटणे मी या जन्मात बघितले नाही. आम्ही हे बिलकुल सहन करणार नाही. टिपू सुलतानची तुलना छत्रपती शिवरायांशी केली त्याबद्दल त्यांनी माफी मागितली पाहिजे, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे. तसेच अशा पद्धतीने ते बोलत असतील आणि काँग्रेस पक्षाने थोडी जरी नैतिकता राहिली असेल तर त्यांनी त्यांची भूमिका मांडली पाहिजे.

तसेच मुलुंडमध्ये जो अपघात झाला त्याविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुलुंडमध्ये जो अपघात झाला हा अत्यंत दुर्दैवी आहे. त्या ठिकाणी जे काम चालले होते, त्यात स्लॅब पडला. त्यात दुर्दैवी मृत्यू देखील झाला आहे, त्यांच्या कुटुंबीयांसोबत आमच्या प्रार्थना आहेत. जे जखमी झाले आहेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची सगळी काळजी ही एमएमआरडीएच्या माध्यमातून आणि राज्य सरकारच्या माध्यमातून घेतली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले आहे.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, हा जो संपूर्ण प्रकार घडलेला आहे, यात आवश्यक ती काळजी घेतली गेली आहे की नाही याची चौकशी केली जाईल. अर्थातच काळजी घेतली असती तर अशी परिस्थिती आली नसती. याला कोण जबाबदार आहे, त्यांच्यावरही कारवाई केली जाईल. आणि तात्काळ जिथे जिथे काम चालू आहे तिथे सेफ्टी ऑडिट करून त्या ठिकाणी अशी घटना घडणार नाही या प्रकारचे प्रयत्न केले जातील. मृतकांच्या परिवाराला शासनाकडून मदत केली जाणार असल्याचेही फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

## अलिबागच्या म्हात्रोळी गावात जमिनीच्या मोजणीवरून राडा

**मुंबई (दै. संध्या)**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासोबत हाणामारी झाल्याचा दावा केला आहे. त्यांनी यासंबंधी एक व्हिडिओ शेअर केला असून, त्यात राहुल नार्वेकर व त्यांच्या सहकाऱ्यांशी एक महिला व व्यक्ती वाद घालताना दिसून येत आहेत. राहुल नार्वेकरांनी ही घटना कुठे व का घडली हे सांगावे अन्यथा मी ती सांगेन, असा इशाराही राऊत यांनी या प्रकरणी विधानसभा अध्यक्षांना दिला आहे. संजय राऊत यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर 'ब्रेकिंग' असा उल्लेख करत हा व्हिडिओ पोस्ट केला. 'विधानसभा अध्यक्षांसोबत ही हाणामारी कोठे आणि का झाली? राहुल नार्वेकर यांनी पळ काढला आहे! तुम्ही सांगताय की मी सांगू?' असा थेट सवाल त्यांनी केला आहे. हे ट्विट त्यांनी राहुल नार्वेकरांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही टॅग केले आहे. त्यामुळे या प्रकरणाला अधिकच राजकीय रंग चढला आहे. संजय राऊत यांनी शेअर केलेल्या व्हिडिओत दिसून येत आहे की, एक महिला आणि एक पुरुष काही कारणावरून राहुल नार्वेकर व त्यांच्या सहकाऱ्यांशी वाद घालत आहेत. घटनास्थळी उपस्थित काहीजण या प्रकरणी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत. सदर महिला नार्वेकरांसोबतच्या एका व्यक्तीला मारहाण करतानाही दिसून येत आहे. पण संजय राऊत यांनी दावा केला तसा नार्वेकरांशी धक्काबुक्की झाली आहे का? हे या व्हिडिओत दिसत नाही. हा व्हिडिओ जुना आहे की ताजा? हे ही अजून स्पष्ट झाले नाही. त्यामुळे हा प्रसंग नेमका कोणत्या पार्श्वभूमीवर घडला, तो वैयक्तिक स्वरूपाचा होता की सार्वजनिक कार्यक्रमातील, याविषयी अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

### ब्रेकिंग न्यूज

#### पंतप्रधान यांच्याहस्ते ई-बस सेवेचे उद्घाटन

नागपूर (दै. संध्या) : केंद्र सरकारच्या पीएम ई-बस सेवा अंतर्गत नागपूर महानगरपालिकेला मिळालेल्या पर्यावरणपूरक ५०इलेक्ट्रिक बसेसचे लोकार्पण शनिवारी पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या हस्ते आभासी पद्धतीने गुवाहाटी येथून करण्यात आले. या योजनेअंतर्गत नागपूरला १५० बसेस मिळणार असून, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ५० बसेस मनपाला प्राप्त झाल्या आहेत. मनपातर्फे पी. एम ई बस सेवा कोराडी आगार येथे आयोजित कार्यक्रमात महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महापौर निता ठाकरे, आमदार कृष्णा खोपडे,संदीप जोशी, उपमहापौर लिला हाथीबेड, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, नगरसेवक विजय झलके, प्रभारी आयुक्त वसुमना पंत, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपायुक्त व परिवहन व्यवस्थापक डॉ. मेघना वासनकर, महादुल्याच्या नगराध्यक्ष हेमलता सावजी यांच्यासह नगरसेवक, अधिकारी उपस्थित होते.

#### सरकारला १३ मार्चपर्यंत मुदत

नागपूर (दै. संध्या) : एम.बी. बी.एस. अभ्यासक्रमातून महत्त्वाचे पाच विषय वगळण्यात आले आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शुक्रवारी केंद्र सरकार व इतर प्रतिवादींना यावर उत्तर सादर करण्यासाठी शेवटची संधी म्हणून १३ मार्चपर्यंत मुदत वाढवून दिली. प्रकरणावर न्यायमूर्ती अनिल किलोर व राज वाकोडे यांच्यापुढे सुनावणी झाली. अंडरग्रॅज्युएट मेडिकल एज्युकेशन बोर्डाने एम.बी. बी.एस. अभ्यासक्रमातून रेस्पिरेटरी मेडिसीन, फिजिकल मेडिसीन अॅण्ड रिहॅबिलिटेशन, इमर्जन्सी मेडिसीन, डेंटिस्ट्री व रेडिएशन ऑन्कोलॉजी हे पाच विषय वगळले आहेत. त्यामुळे इंडियन चेस्ट सोसायटी व इंडियन असोसिएशन ऑफ फिजिकल मेडिसीन अॅण्ड रिहॅबिलिटेशन यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. ऑफ आधीच्या मेडिकल कौन्सिल इंडियानुसार एम.बी.बी.एस. अभ्यासक्रमाकरिता हे पाचही विषय बंधनकारक होते.

## तपास अधिकारी बदलले अन् पंढरपूरमधील ‘त्या’ क्राईम मिस्ट्रीचा उलगडा

**पंढरपूर (दै. संध्या)**



आषाढी वारी संपल्यानंतर पंढरपूर शहरात घडलेल्या मायलेकाच्या निर्घृण दुहेरी हत्याकांडाने संपूर्ण राज्य हादरले होते. या घटनेनंतर तब्बल आठ महिने उलटूनही आरोपींचा छडा लागत नसल्याने पोलिसांवर प्रचंड दबाव होता. तपासासाठी आंदोलने झाली, तपास अधिकारी बदलले; मात्र या खुनाचे कोडे उलगडत नव्हते. अखेर या प्रकरणाचा तपास IPS अधिकारी प्रशांत डगळे यांच्याकडे आला आणि अवघ्या एका महिन्यात या दुहेरी हत्येचा उलगडा करत आरोपींना गजाआड करण्यात पोलिसांना यश आले. पंढरपूर शहरातील लखन संजय जगताप हा तरुण आणि त्याची आई सुरेखा जगताप यांची रात्री साडेनऊच्या सुमारास भर वस्तीतील त्यांच्या घरात घुसून अत्यंत क्रूरपणे हत्या करण्यात आली होती. आधी लखनवर तब्बल 16 वार करण्यात आले. हा प्रकार पाहणाऱ्या आई सुरेखालाही नऊ वार करून ठार मारण्यात आले. अवघ्या दहा मिनिटांत हे दुहेरी हत्याकांड करून आरोपी फरार झाले होते. या प्रकरणात घटनास्थळी कोणताही CCTV पुरावा उपलब्ध नव्हता. तपासाचे ठोस धागेदोरे मिळत नसल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे होते.

# विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नाही : छगन भुजबळ

### सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होणे अन् त्यांची अध्यक्षपदी निवड करणे यालाच आमचे प्राधान्य

**मुंबई (दै. संध्या)**



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी शनिवारी राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा विषय आमच्यापुढे नसल्याचं स्पष्ट केले आहे. रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे का? ही चर्चा आज, उद्या, महिना किंवा 2 महिन्यांनीही करता येईल. या प्रकरणी घाई करण्याची काहीच गरज नाही, असे ते म्हणालेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी झालेल्या एका विमान अपघातात निधन झाले. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले आहे. राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने आमची अजित पवारांशी विलीनीकरणाच्या मुद्यावर चर्चा सुरू होती व 12 फेब्रुवारी रोजी विलीनीकरणाची अधिकृत घोषणा होणार होती असा दावा केला आहे. पण अजित पवारांच्या पक्षाने त्यांचा हा दावा फेटाळून लावला आहे. या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ यांनीही सध्या आपल्या पक्षाचे प्राधान्य विलीनीकरणाला नव्हे तर सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होण्याला असल्याचे स्पष्ट केले. छगन भुजबळ पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले, रोज विलीनीकरण, विलीनीकरण, विलीनीकरण ही काय चर्चा आहे? ही चर्चा आजही करता येईल, महिन्याने करता येईल किंवा दोन महिन्यानेही करता येईल. घाई करण्याचे कारण काय? सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्री झाल्यात. राष्ट्रीय अध्यक्ष म्हणूनही आम्ही त्यांची निवड करणार आहोत. त्यानंतर त्या पक्षाचे जे काही प्रमुख लोक आहेत किंवा त्यांना जे योग्य वाटतील त्यांना बोलावून या मुद्यावर चर्चा करतील. शेवटी एवढा मोठा निर्णय दोन्ही बाजूंच्या लोकांशी चर्चा करूनच होईल. त्यावर एवढी घाई करण्याची गरज नाही. परंतु आज ते ठरलेच होते, ते झालेच पाहिजे असे म्हणण्याला काहीच अर्थ नाही. तिथे नवीन कॅप्टन आलेत. त्यांना बसू द्या. त्यांना काम करू द्या. त्यांना समजून घेऊ द्या. त्यानंतर त्या काय करायचे ते पाहतील. आज आमच्यापुढे हा विषय खरोखरच नाही. सुनेत्रा पवार स्थिर स्थावर होणे व त्यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करणे हाच आमच्यापुढे प्राधान्यक्रमाचा विषय आहे, असे ते म्हणाले. छगन भुजबळ पुढे म्हणाले, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्याचा निर्णय 100 टक्के ठरला आहे. त्यामुळे याविषयी शंकाकुशंका घेण्याची काहीच गरज नाही. हा निर्णय झाला आहे. या प्रकरणी मोघम बोलण्यात काही अर्थ नाही. आम्ही कॅप्टन नेमले आहेत.

# राष्ट्रवादी विलीनीकरणावर शशिकांत शिंदे यांचा ब्रेक, आता नो कॉमेंट्स

**मुंबई (दै. संध्या)**



राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या चर्चेला नव्याने उधाण आले असताना, शशिकांत शिंदे यांनी अचानक या विषयावर पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे. अजित पवार यांच्या अकस्मित निधनामुळे अनेक राजकीय प्रश्न अनुत्तरित राहिले असून, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया देखील त्यामुळे रखडल्याचे ते म्हणाले. अजित पवार आणि शरद पवार यांच्यात एकत्र येण्याबाबत चर्चा सुरू होती, याबाबत दोन्ही बाजूंच्या नेत्यांकडून वेगवेगळे दावे होत असताना शिंदे यांनी मात्र आता या विषयावर काहीही भाष्य करणार नाही, अशी भूमिका जाहीर केली आहे. अजित पवार गटातील नेत्यांच्या मते, दोन्ही नेत्यांमध्ये काय चर्चा झाली होती याबाबत स्पष्ट माहिती नाही. मात्र शरद पवार गटातील काही नेत्यांचे म्हणणे असे की, विलीनीकरणाची चर्चा अंतिम टप्प्यात पोहोचली होती आणि 12 फेब्रुवारी रोजी पक्ष एकत्र आणण्याची तयारीही झाली होती. या पार्श्वभूमीवर शशिकांत शिंदे यांनी राष्ट्रवादी, या मासिकात लेख लिहून अनेक खुलासे केले. त्या लेखात दोन्ही पक्षांचे विलीनीकरण होऊन नेतृत्व अजित पवारांकडे देण्याचा प्रस्ताव चर्चेत असल्याचा उल्लेख करण्यात आला होता. या दाव्यांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली. लेख प्रसिद्ध झाल्यानंतर शशिकांत शिंदे चर्चेच्या केंद्रस्थानी आले. माध्यमांनी त्यांच्याशी संपर्क साधून अधिक माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणासंदर्भात काही निर्णय झाले होते आणि अजित पवार गटातील नेतेही त्याबाबत बोलत आहेत. आम्हीच मागे लागलोय असे चित्र निर्माण केले जात आहे, पण आमच्याकडून कोणतीही गडबड नाही. आम्ही जे बोललो ते सत्य बोललो. मात्र आता हा विषय आम्ही बंद केला आहे, असे ते म्हणाले. यासोबतच त्यांनी अजित पवारांविषयीच्या आपल्या पूर्वीच्या वक्तव्याबाबतही स्पष्टीकरण दिले. मी जर अजितदादांची चूक झाली असे म्हटले असेल, तर मी माझे शब्द मागे घेतो, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यांच्या मते, अजित पवारांना पक्षाच्या विभाजनाबाबत काही दुरुस्ती करायची होती आणि ते त्या विषयावर भावनिक होते. शरद पवार यांच्यासोबत झालेल्या भेटीतही अजित पवारांनी कधी नजरानजर केली नाही, असे शिंदे यांनी सांगितले.

## मुलुंड परिसरातून जात असतानाच मेट्रो पिलरचा सिमेंट ब्लॉक कोसळला

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबईतील मुलुंड (पश्चिम) परिसरात आज शनिवारी दुपारी मेट्रो बांधकामादरम्यान गंभीर अपघात घडला. एलबीएस रोड LBS Road वरील बांधकाम सुरू असलेल्या मेट्रो पिलरचा सिमेंटचा एक भाग अचानक तुटून खाली पडला. हा तुकडा रस्त्यावरून जात असलेल्या ऑटो रिक्षा आणि एका कारवर कोसळला. ही घटना जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ घडली. प्राथमिक माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.२० वाजता या अपघाताची माहिती संबंधित यंत्रणांना मिळाली. या दुर्घटनेत ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या तीन ते चार जण जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. रिक्षातील एकाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. तर या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रिक्षा मधील फॅमिली उत्तर प्रदेशवरून आली होती, लग्नासाठी जात असताना अपघात झाला आहे. या भीषण घटनेत रिक्षातील एकाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. मयत रिक्षातील सरपंचाची बॉडी शवविच्छेदन करण्यासाठी मुलुंडमधील उपासनी हॉस्पिटल मधून घाटकोपर राजावाडीसाठी घेऊन जात आहे. मुंबईच्या रितू तावडे महापौर आणि उपमहापौर संजय घाडी मुलुंड मधील उपासनी हॉस्पिटलमध्ये विचारपूस करण्यासाठी दाखल झाले होते. याच हॉस्पिटलमध्ये जखमींवर उपचार सुरू आहे. मुलुंड मध्ये मेट्रोचा स्लॅब कोसळून मृत्यू झालेले रामधन यादव हे उत्तर प्रदेश राज्यातील एका गावचे सरपंच असल्याची माहिती समोर आली आहे.

# टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे

**बुलढाणा (दै. संध्या)**

■ छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे; हर्षवर्धन सपकाळांचे वादग्रस्त विधान



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी वादग्रस्त विधान करत महाराष्ट्रात नव्या वादाला तोंड फोडले आहे. ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी शौर्य आणि स्वराज्य असा विचार दिला, अगदी त्याचप्रमाणे टिपू सुलतान यांनी त्याच समकक्ष काम केले आहे. त्यामुळे टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष मानले गेले पाहिजे, असे विधान सपकाळ यांनी केले आहे. दरम्यान, यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. हर्षवर्धन सपकाळ यांना लाज वाटली पाहिजे, तसेच त्यांनी माफी मागावी, अशी मागणी फडणवीस यांनी केली आहे. मालेगावात महानगरपालिकेतील उपमहापौरांच्या दालनातील टिपू सुलतानच्या फोटोवरून वाद निर्माण झालेला असतानाच, त्यात हर्षवर्धन सपकाळ यांच्या वादग्रस्त विधानाने आणखी वाद पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सपकाळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांचं शौर्य ज्याप्रकारचे आहे, त्यांनी जो स्वराज्याचा विचार दिला, त्याच मांदियाळीत, त्यांच्यानंतर बऱ्याच वर्षांनी टिपू सुलतान यांनी इंग्रजांच्याविरोधात लढा पुकारला होता. त्या अर्थाने टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे योद्धे होऊन गेले, भारताचे भूमिपूत्र होऊन गेले, त्यांनी कधीही कोणत्याही विषारी, विखारी विचारांना जवळ केले नाही. त्यामुळे शौर्याचे लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांच्याकडे शिवाजी महाराजांच्या समकक्ष पाहिले पाहिजे, असे सपकाळ यांनी म्हटले आहे. ते बुलढाण्यात बोलत होते. दरम्यान, यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी राजकारणावरही भाष्य केले आहे. ते म्हणाले, नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयात 50 हजारांची लाच घेतली, हे प्रकरण फार छोटे आहे. हे संपूर्ण सरकारच लाचखोर आहे. नरहरी झिरवाळ यांच्यावर कारवाई तर व्हायलाच पाहिजे पण कोट्यवधी रुपये खाणारे देवेंद्र फडणवीसांवर काय कारवाई करणार हे आधी सांगा. या असंवैधानिक सरकारचा आम्ही निषेध करतो.

## अजित पवार यांनी सही केलेली शेवटची फाईल नेमकी कोणती?

**नागपूर (दै. संध्या)**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर अजूनही उलटसुलट चर्चा सुरू आहे. या चर्चेत आता एका महत्त्वाच्या तपशिलावर लक्ष वेधले गेले आहे. दिवंगत अजित पवार यांनी मृत्यूपूर्वीच्या रात्री ज्या फाईलवर सही केली, ती नेमकी कोणती होती? ती गोंदिया जिल्ह्यातील राईस मिलशी संबंधित होती का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

आमदार रोहित पवार आणि सरोज अहिरे यांनी या फाईलबाबत काही खळबळजनक दावे केले आहेत. रोहित पवारांच्या मते, ही फाईल विदर्भातील, प्रामुख्याने भंडारा–गोंदिया पट्ट्यातील एका प्रभावशाली नेत्याशी संबंधित राईस मिलशी जोडलेली होती. त्यांनी थेट नाव न घेता सूचित केले की, महायुतीमधील एका महत्त्वाच्या नेत्याने त्या रात्री अजितदादांना मंत्रालयात किंवा सागर बंगल्यावर थांबवले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, ही फाईल फक्त परवाना मंजुरीपुरती मर्यादित नव्हती; ती थकीत देयके आणि अनुदानाशी संबंधित होती. सरोज अहिरे यांच्या दाव्यानुसार, विदर्भातील ‘धान खरेदी’ आणि राईस मिलर्सना द्यावयाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीच्या मंजुरीसाठीही ही फाईल होती.

रोहित पवारांनी असेही म्हटले की, एका राजकीय सल्लागाराचे कंत्राट रद्द करून दुसऱ्या कंपनीला काम देण्याच्या प्रक्रियेतही या फाईलचा संबंध होता, ज्यात त्या राईस मिल मालकाचेही हित गुंतलेले होते. ही राईस मिल विदर्भातील धान उत्पादक पट्ट्यात अनेक वर्षांपासून कार्यरत आहे, मात्र अलीकडच्या काळात तिच्या विस्तारासाठी आणि सरकारी योजनांद्वारे मोठ्या निधीच्या मंजुरीसाठी ही फाईल तयार करण्यात आली होती, असे समजते.

## संपादकीय

# व्हॅन गॉगच्या 'पिवळ्या सूर्यफुलां'मध्ये दडलेली अतृप्त तहान!

पिवळी सूर्यफुलं म्हटलं की नजरेसमोर येतात ती फक्त आणि फक्त व्हॅन गॉगची सूर्यफुलं. इंटरनेटवर पिवळी सूर्यफुलं टाइप करायचा अवकाश, लाखो वेबसाइट्समधून सडा पडतो, तोही त्यांचाच. चित्रासोबत चित्रकाराचं नाव घट्ट जोडलं गेल्याचं सर्वात लोकप्रिय उदाहरणही हेच. पिवळ्या रंगाच्या फक्त तीन छटांमध्ये रंगवलं गेलेलं हे साध्या, बिनवासाच्या, फुलदाणीत खोचलेल्या फुलांचं पेंटिंग. रंगाच्या जाड, इम्पास्टो थरामुळे एक विशिष्ट पोत चित्राला आहे. रंगांचा कल्लोळ नाही, शांत सुरेल मेळ आहे. पोस्ट इम्प्रेशनिस्ट शैलीचं उत्कृष्ट उदाहरण. व्हॅन गॉगने अनेक पिवळी सूर्यफुलं रंगवली. काही आनंदी, उत्फुल्ल मन:स्थितीत रंगवली, काही उदास, निराश असताना. प्रत्येक मूड प्रत्येक पिवळ्या सूर्यफुलात उतरला. आर्ल्सच्या पिवळ्या घरात आपला प्रिय मित्र पॉल गोगीन राहायला येण्याच्या आतूर खुशीत व्हिन्सेन्टने मित्राच्या स्वागताप्रीत्यर्थ, त्याची झोपण्याची खोली, लिहिण्याची जागा सजवायला एकूण बारा पिवळ्या सूर्यफुलांची चित्रमालिका रंगवायला घेतली. त्यापैकी अकरा तो पूर्ण करू शकला. आता ती जगभरात विखुरलेली आहेत. अनेक आठवडे खपून, सहवासाची आस, मैत्रीची आशा, पुन्हा एकदा नव्याने आयुष्य सुरू करण्याची आकांक्षा कुंचल्याच्या प्रत्येक फटकाऱ्यात ओतून ज्याच्याकरिता सूर्यफुलं इतक्या उत्साहात रंगवली, तो मित्र पिवळ्या घरात राहायला आला खरा; पण ते वास्तव्य काही सुखावह ठरलं नाही. दोन महिन्यांचा हा कालावधी पुढच्या असंख्य दुर्दैवी, दु:खद प्रसंगांची नांदी ठरला, ज्याची परिणती अखेर व्हिन्सेन्टच्या आयुष्याची अखेर होण्यात झाली. नंतर गोगीनने लिहिलं, 'ही सूर्यफुलं व्हॅन गॉगचं सेल्फ पोर्ट्रेट आहे. त्याची चित्रशैली आणि स्वभावासकट संपूर्ण व्हिन्सेन्ट मला या सूर्यफुलांत दिसतो.' आपल्या रंग कौशल्याने मित्राला प्रभावित करण्याची तीव्र आस या फुलांमध्ये होती. 'ही फुलं मला आपली वाटतात,' त्याने थिओला लिहिलं आहे. आपल्या आवडत्या पिवळ्या रंगाची अनेक मिश्रणं करून बघण्याचा छंद त्याला होता. पॅरिसच्या गजबजलेल्या प्रदूषित शहरी वातावरणातून दक्षिणेच्या प्रोव्हेन्समधल्या उबदार, लख्ख सूर्यप्रकाशित प्रदेशात आल्यावर अत्यंत आशावादी मनोवृत्तीत व्हॅन गॉगने रंगवायला घेतलेली ही सूर्यफुलं एका अर्थाने त्याच्या स्थलांतरणाचंही प्रतीक. चित्रांमधल्या प्रतीकात्मतेचं आकर्षणही त्याला होतंच. आपले चित्रविषय खूप विचारपूर्वक निवडायचा तो. निष्ठा, प्रेम, भक्ती, भारावलेपणाचं प्रतीक असलेली ही सूर्यफुलं. त्याआधी पॅरिसमध्ये राहत असतानाही त्याने सूर्यफुलं रंगवलीच होती; पण ही वेगळी, खास होती. त्यात भावनिक खोली आहे, चित्रकार म्हणून, माणूस म्हणून व्यक्तिमत्त्वात आलेली परिपक्वता आहे. सूर्यफुलाची मान प्रकाशाच्या लालसेत सदैव सूर्याच्या दिशेनेच वळलेली असते. व्हॅन गॉगमध्येही अशी लालसा होती, जगण्याकरिता त्याला सदैव प्रकाशाची गरज लागे. अध्यात्माची, मानवी सहवास, प्रेमाची ऊब, कौतुकाचं खतपाणी याकरता तो सदैव तहानलेला होता. मृत्यूपर्यंत त्याची ती तहान सर्वार्थाने कधीही भागली नाही. मृत्यूनंतर ही सूर्यफुलं व्हॅन गॉगच्या जगण्याच्या आसक्तीचं, त्याच्या जीवनेच्छेचं प्रतीक म्हणून अजरामर व्हावीत, यापेक्षा वेगळी आयरनी कोणती? आर्ल्समधल्या अखेरच्या, एकाकी दिवसांत, सैरभैर मन:स्थितीत रंगवलेली सूर्यफुलं, कोमेजून गेलेली, माना टाकलेली तरीही एकदा शेवटी प्रयासपूर्वक सूर्याच्या दिशेने बघायचा प्रयत्न करणारी. सुकत गेलेली, मरणपंथाला लागलेली, तपकिरी छटेतली... अपरिहार्य जीवनचक्र, आशा-निराशेचं एक वर्तुळ व्हिन्सेन्टने पूर्ण केलं, हे खरंच!

## संस्कृत सुभाषित

दुर्जन: प्रियवादीच नैतद् विश्वासकारणम् । मधु तिष्ठति जिव्हाग्रे हृदि हालाहलं विषम् ।।

अर्थ : दुष्ट माणूस गोड बोलत असला तरी त्याच्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्याच्यावर जिभेवर मध असला तरी हृदयात मात्र भयंकर विष असते.

## गुरु वचन

### दृढ संकल्पात सर्व शक्य

आध्यात्मिक, मानसिक, शारीरिक व सामाजिक असे विकासाचे चार प्रकार आहेत. निरंतर आध्यात्मिकतेकडे अग्रेसर राहण्यातच मानव-जीवनाची सार्थकता आहे. यासाठी मानवी मनोवृत्तीचे निर्मलीकरण व दिव्यीकरण आवश्यक आहे. सतत उपासनेमुळेच हे शक्य आहे. उपासनामुळे आत्मबळ मिळते. दैवी दयाचा अनुभव उपासनानेच होतो. उपासनाचे २ प्रकार मानले गेले आहेत -वैधी तथा नामरूप स्मरणात्मक. वैधी उपासना दुष्कर आहे. ती जटील विधि-विधानांच्या मालिकेत अडकली आहे. याउलट नामरूप स्मरणात्मक उपासना कुठलीही औपचारिकताची अपेक्षा किंवा नियम-उपनियमाने बांधिल नाही. याद्वारे सुख व दु:ख, दोन्ही एकरुप होण्याची शक्ती मिळते, हृदय शांत होते, मनाला आराम मिळतो, बुद्धीचे तेज वाढते व अंत:करण स्वच्छ होते. नामस्मरणाने साधक सौरमंडळ भेदून ब्रह्मांडाचा अधिकारी बनतो म्हणून कबीर म्हणतात की, जोपर्यंत शरीरात प्राण आहे तोपर्यंत निर्भय होऊन ईश्वराचे नामस्मरण करत राहिले पाहिजे. तेलाप्रमाणे आयुष्य संपल्यावर शरीर रूपी ज्योत बिझते. साधना व साध्य दोन वेगवेगळ्या वस्तू नाहीत. त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. एकाच्या अभावात दुसरे मिळू शकत नाही. लक्ष्य विदित झाल्यावरच साधनाचे स्वरूप निर्धारित होऊ शकते. शास्त्र सांगते की, जर तुम्हाला देवत्व मिळाले तर पुन्हा या जगात येऊ शकणार नाही. जिज्ञासुच्या रुपात आपली बुद्धीमत्ता यातच आहे की, प्रथम सर्व इंद्रियांना मनात निरुद्ध करावे, मनाल ज्ञान-स्वरूप बुद्धीत विलीन करावे, ज्ञानस्वरूप बुद्धीला महान आत्म्यात विलीन करावे व यास शांत स्वरूप परमात्म्यात विलीन करावे. दृढ संकल्पानेच हे शक्य आहे. जेव्हा संकल्प दृढ असतो, ईश्वर चरणी अखंड विश्वास असतो तेव्हा उद्देश साध्य होतो. संकल्प शुद्धी व दृढतेने ईश्वरास सुद्धा तासनतास नाचवले आहे. वास्तवात दृढ संकल्प एका गडाप्रमाणे आहे, जो भयंकर प्रलोभनांपासून आपणास वाचवतो.

## उपदेशकथा

### कष्टाचे महत्त्व

एका नगरीत एक धनिक राहात होता. त्याला पाच मुले होती. त्या सर्वांची त्याने लग्ने केली. पहिल्या चारही भावांच्या बायका घरकामात आळशी होत्या. कामावरून त्यांच्यात भांडणे होत असत. पाचवी सून गरीब घरातील व सुशिक्षित होती. तिने आल्याबरोबर पाहिले की, घरकाम करायला कोणीही पुढे येत नाही. ती रोज पहाटे उठून सर्व घरकाम करू लागली. स्वादिष्ट भोजन बनवून सर्वांना जेवायला वाढून मग स्वत: जेवू लागली. त्यामुळे सासू तिच्यावर खुश झाली. सासू तिला म्हणाली, 'तुला एकटीलाच सर्व काम करावे लागते म्हणून तुला राग येत नाही का? तेव्हा ती म्हणाली, 'सासूबाई कामाने काही कोणी मरत नाही. उलट चांगला व्यायाम होतो व शरीर निरोगी राहते. स्वत:च्याच घरचे काम करण्यात लाज कसली? हे सर्व जावांनी ऐकले व लज्जेने त्यांची मान खाली गेली. तेव्हा त्यांना समजले की घरचे काम सगळ्यांनी मिळून केले तर घरात आणखीनच आनंद निर्माण होईल.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:वणिज १७:०५:०७ |
| १५ फेब्रुवारी २०२५ | करण:विष्टि २९:२३:५६+ |
| रविवार | सूर्य:कुम्भ |
| विक्रम संवत्- २०८२ | चन्द्र:मकर००:४१:५९ |
| माघ शके संवत्- १९४७ | हिजरी सन् - १४४६ |
| संवत्सर - विश्वावसूनाम | मुस्लिम मास - शाबान |
| अयन- उत्तरायणारंभ | तारीख - २६ |
| मास- माघ | विशेष |
| ऋतु- सौर शिशिर | संत सेवालाल |
| कृष्ण पक्ष | महाराज जयंती |
| तिथि:त्रयोदशी १७:०५:०७ | महाशिवरात्री शिवपूजन |
| नक्षत्र:उत्तराषाढा | निशीथकाल उ. रात्रौ |
| १९:४८:०० | ००.२८ पासून १.१८ पर्यंत |
| योग:व्यतीपात | शिवगजानन यात्रा - |
| २६:४६:१६+ | बाळापूर (अकोला) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८६१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | 7 |
| 5 | | 7 | 1 | | | | | 8 |
| | 4 | | | | 7 | 9 | 5 | 1 |
| | 5 | 9 | | 3 | | 6 | 8 | 2 |
| | | | 2 | 5 | 1 | | | |
| 4 | 7 | 2 | | 8 | | 1 | 3 | |
| 3 | 1 | 4 | 8 | | | | 7 | |
| 2 | | | | | 9 | 4 | | 6 |
| 7 | | | | | | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८६० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | 8 | 2 | 1 | 4 | 3 | 9 | 7 | 5 |
| 5 | 9 | 4 | 7 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |
| 7 | 3 | 1 | 6 | 9 | 5 | 2 | 4 | 8 |
| 9 | 4 | 6 | 3 | 5 | 8 | 1 | 2 | 7 |
| 2 | 7 | 3 | 4 | 6 | 1 | 5 | 8 | 9 |
| 8 | 1 | 5 | 2 | 7 | 9 | 3 | 6 | 4 |
| 3 | 2 | 7 | 5 | 1 | 4 | 8 | 9 | 6 |
| 4 | 5 | 9 | 8 | 3 | 6 | 7 | 1 | 2 |
| 1 | 6 | 8 | 9 | 2 | 7 | 4 | 5 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ३९९ – सॉक्रेटिसला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली.
- १६३७ – फर्डिनांड तिसरा पवित्र रोमन सम्राटपदी.
- १७६४ – अमेरिकेतील मिसुरी राज्यात सेंट लुई शहराची स्थापना.
- १८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – जनरल युलिसिस एस. ग्रँटने टेनेसीतील फोर्ट डोनेलसन किल्ल्यावर हल्ला चढवला.
- १८७९ – अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात स्त्री वकिलांना खटले लढवण्यास परवानगी.
- १८९८ – क्युबाची राजधानी हवानाच्या बंदरात अमेरिकन युद्धनौका यु.एस.एस. मेन वर स्फोट. २६० ठार. स्पॅनिश-अमेरिकन युद्ध सुरू.

### राष्ट्रीय

- २००८ – जम्मूच्या एका स्थानिक न्यायालयाने पाकिस्तानची गुप्तहेर संस्था आयएसआयच्या दोन हस्तकांना १७ वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.

### जन्म

- १४७१ – पियेरो दि लॉरेन्झो दे मेदिची, फ्लोरेन्सचा राजा यांचा जन्म.
- १५६४ – गॅलेलियो, इटलीचा भौतिकशास्त्रज्ञ व अंतराळतज्ज्ञ यांचा जन्म.
- १७१० – लुई पंधरावा, फ्रांसचे राजा यांचा जन्म.
- १८२० – सुझन बी. अँथोनी, अमेरीकेतील स्त्रीमुक्तिवादी कार्यकर्ती यांचा जन्म.
- १८४१ – मनोएल फेरेझ दि काम्पोस सॅलेस, ब्राझिलचे राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.

### निधन

- ११४५ – पोप लुशियस दुसरा यांचे निधन.
- १६३७ – फर्डिनांड दुसरा, पवित्र रोमन सम्राट यांचे निधन.

## : SMS :

What is d similarity between a successful Charterd Accountant & Miss Universe?
Both are Very 'CONSCIOUS'about "FIGURES"

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २८.८ | १८.७ |
| अहमदनगर | २८.१ | १८ |
| अकोला | ३१.८ | २० |
| अमरावती | ३०.३ | १९ |
| बीड | ३१.४ | १८.२ |
| भंडारा | ३०.६ | १७.१ |
| बुलढाणा | २३.२ | १०.४ |
| चंद्रपूर | ३१.७ | १९.८ |
| चेन्नई | ३१.३ | २२.३ |
| नवी दिल्ली | २३.३ | ११.५ |
| धुळे | ३१.५ | १९.१ |
| गोंदिया | २९.३ | १७.७ |
| जळगाव | ३१.७ | १८.७ |
| कोल्हापूर | २९.४ | १४.८ |
| लातूर | २९.४ | १६.८ |
| मुंबई | ३१.१ | २३.६ |
| नागपूर | २९.७ | २०.१ |
| नांदेड | ३०.६ | १८.९ |
| नंदूरबार | ३०.४ | २०.१ |
| नाशिक | २९.९ | १५.३ |
| पुणे | २८.६ | १५.४ |
| पंढरपूर | २९.६ | १७.२ |
| सातारा | २९.६ | ११.४ |
| सांगली | ३०.३ | १३.६ |
| सोलापूर | ३०.३ | १८.३ |
| वर्धा | ३०.९ | १७.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** कौटूंबिक जीवन सुखमय राहील. एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीची भेट होईल. व्यापारिक संबंधात योग्य निर्णय घेऊ शकाल.

**तुळ :** साहसामुळे आपल्याला यश मिळेल. चोरी किंवा नुकसानीचे योग आहेत. व्यवसाय क्षेत्रात लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** आपल्या दुर्व्यसनांवर नियंत्रण ठेवणे जरुरी आहे. बुद्धि आणि मनोबलाने मिळकतीत वाढ होऊ शकते. काही नवीन योजना आखाल.

**वृश्चिक :** व्यवहारात स्पष्टता ठेवायला हवी. मित्र आणि कुटूंबाचे कामात सहकार्य लाभेल. सामाजिक प्रतिष्ठा कमी होण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** मुलांच्या आरोग्याची चिंता राहू शकते. साहस, पराक्रमात वाढ होईल. नोकरीत बढतीचे योग आहेत. व्यापारात स्वत:च्या निर्णयाने कामे करा.

**धनु :** लाभ मार्ग प्रशस्त होईल. कष्टाने कामे साध्य होतील. व्यावसायिक किंवा आजीविका संबंधीत समस्येचे समाधान होईल. कुटूंबाची चिंता राहिल.

**कर्क :** स्थायी संपत्ती वाढविण्यात घाई करु नका. कर्ज घ्यावे लागू शकते. परिवाराकडून धीर मिळेल. धर्म कार्यात रुची वाढेल.

**मकर :** प्रसन्नता आणि आशाजनक वातावरणामुळे प्रयत्न यशस्वी होतील. प्रकृती उत्तम राहील. कायद्याच्या प्रकरणात दुर्लक्ष करु नका.


**सिंह :** प्रयत्न आणि दुरदर्शीपणामुळे सहकार्य आणि समर्थन मिळेल. सहचरिणीची उन्नती सामाजिक सन्मानात भर टाकेल. वाहन सुख मिळेल.

**कुंभ :** सामाजिक यश व सन्मान मिळेल. कौटूंबिक सुख आणि पत्नीच्या सहकार्याने मन प्रसन्न राहिल. वाद-विवाद आणि भांडणांपासून दूर रहा.

**कन्या :** व्यापारिक निर्णय गोपणीय ठेवा. व्यवहार कौशल्याने अधिकाऱ्यांच्या सन्मानास पात्र होऊ शकाल. आर्थिक कार्य पूर्ण झाल्याने आनंद होईल.

**मीन :** कामात आळस आणि निष्काळजीपणा करु नका. व्यापार चांगला राहिल. थोड्या प्रयत्नांनी लाभ मार्ग सुकर होईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८६१



**आडवे शब्द**

१. दिवाळीपासून सुरु
७. पाढे, ेक इ. पाठांतर
११. गीते
१२. लागू आडनावाच्या नटीचे नाव
१४. सुंदर
१५. तरंगणारा थर
१६. खानदान
१७. दुष्ट, नीच
२०. मऊ
२२. बैठे लाकडी आसन
२३. सदन
२४. प्रगतीशील
२५. वस्त्र विणण्याचे यंत्र
२६. सुंदर, मस्त
२७. आचारी
२९. तेज
३०. पाणी
३१. कडुलिंब (हिंदी)
३३. मोठी सुई
३४. थोडक्यात सप्रेम नमस्कार विनंती विशेष
३७. आठवण
३८. बैलाच्या गळ्यात बांधायची दोरी
४०. साठ वर्षांचे झाल्यावर बुद्धी चळते या अर्थाचा वाक्प्रचार
४२. साधना
४४. माझे
४५. कबुतर
४६. बंगाल
४८. दात
५०. थंडगार
५१. पराभव
५३. लहान वयात काम करणारा
५४. शिक्षणासाठी मुलांची राहण्याची केलेली व्यवस्था
५६. अंतराळवाहन
५७. आचार्य अत्रे यांचे दैनिक
५८. महाभारतातील पाच भाऊ
६०. टप्पा, ६१. भारत
६२. माळ, ६३. कवितेतील परिच्छेद
६४. अधिकमास,
६६. बागवान
६७. बाणांचा वर्षाव
७०. लेखणी, ७३. चुलता
७५. पंजाबातील एक नदी
७८. संतोष, तृप्ती
७९. कुमक
८०. फुटक्या नशीबाचा
८१. जिवाची अस्वस्थता

**उभे शब्द**

२. मरूभूमी, नदीकाठचा परिसर
३. स्वस्थ, गप्प
४. अंघोळीची जागा
५. उपवासाचे धान्य
६. माल, वस्तू
८. लक्ष्मी
९. चेहरा
१०. नोकरदार
१३. ओठ
१५. निरीक्षक
१८. कृष्णसखी
१९. दहावी रास
२१. घट्ट विळखा
२३. गर्द
२७. खाणीतील मजूर
२८. नवऱ्याचे वडील
३२. मृत
३५. विश्रांती
३६. मतिमान
३९. युद्ध
४१. सापाचा भाऊ
४३. दुसऱ्याच्या जागी स्वत:ला कल्पिणे
४५. कबुतर
४६. पाण्याची सार्वजनिक जागा
४७. हाल, कष्ट
४९. दाबून टाकणे
५१. महिना
५२. सापकिरडू इ.
५५. आयुष्यातील संसार करण्याचा काळ
५७. स्निग्ध औषध
५९. फांदी
६०. मोठे पाप
६१. हिंसा करणारा
६३. कसबी, कुशल
६५. वेल
६६. एका पाठी एक
६८. अर्क
६९. मऊ, रेशमी
७१. शेजारी, जवळ
७२. चिंतन
७४. ध्येय
७६. लोक
७७. एक गड्डा पानभाजी
७८. सारखे

### जम्बो शब्दकोडे क्र. ८६० चे उत्तर

आडवे उत्तर : १.कडेलोट ५.अमरलता ९.आकार ११.चरचरीत १४.दडी १५.रदन १७.रकमपात १९.हवालदार २१.कसा २२.बाता २३.तार २५.कोरफड २७.रीतसर २९.शर ३१.खाजगी ३२.रजक ३४.यदा ३५.जमेस ३६.कौल ३७.मदन ३८.आई ३९.दार ४१.खस ४२.मानधन ४३.दिवस ४५.फारकत ४७.वाल्या कोळी ४९.वनराज ५१.नमन ५२.नवरस ५३.समता ५५.सरडा ५६.बोरकर ५८.मम ५९.कलमा ६०.खडाजंगी ६२.सेनानी ६४.सतविणे ६५.ईश्वर ६६.वटवट ६७.रत ६९.वचा ७१.वसा ७१अ.ककडी ७३.नगर ७५.कसकस ७७.हड्डी ७८.शाक ७९.जवाहरलाल ८०.रमाकांत ८१.खळाळ

उभे उत्तर : १.कपार २.लोचन ३.टर ४.बारीक सारीक ६.मदत ७.रडी ८.ताटवा ९.आमदार खासदार नगरसेवक १०.रस्सी १२.चरक १३.तम १६.दशरथ कौसल्या १८.पावस १९.हताश २०.लता २४.बगीचा २६.डर २८.रयनदिवस ३०.रजई ३३.जपान ३७.मनकवडा ३८.आसरा ४०.रकम ४१.खवा ४२.माळी ४४.वन ४६.तन ४८.कोयता ५०.जबर ५२.नरमाई ५३.समसमान ५४.ममता ५५.सल ५६.बोगी ५७.धनी ५९.कणेर ६०.खरवस ६१.जंग ६३.नाटकशाळा ६६.वसाहत ६८.तगर ७०.चाकर ७२.डिकळ ७४.गज ७४अ.रवा ७५.कल ७६.समा

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## जनरल मिल्सची महाराष्ट्रात 100 कोटी रुपयांची गुंतवणूक

■ नाशिक येथे सुरू केला नवीन उत्पादन प्रकल्प

पुणे (दैनिक संध्या) : अमेरिकास्थित 'फॉर्च्युन ५००' खाद्य कंपनी जनरल मिल्स इन्क. चा एक भाग असलेल्या जनरल मिल्स इंडिया ने नाशिक येथे अत्याधुनिक उत्पादन केंद्राचे उद्घाटन केले. हा नवीन आणि अत्याधुनिक प्रकल्प कंपनीच्या भारतातील उत्पादन विस्ताराचा एक महत्त्वाचा टप्पा असून, वेगाने वाढणाऱ्या भारतीय अन्न आणि बेकरी क्षेत्राप्रती असलेली कंपनीची दीर्घकालीन वचनबद्धता पुन्हा अधोरेखित करतो. जनरल मिल्सने हा प्रकल्प उभारण्यासाठी सुमारे १०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून, नाशिकमधील कंपनीची ही दुसरी उत्पादन सुविधा आहे. या प्रकल्पाची उभारणी प्रगत उत्पादन तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाचे गुणवत्ता निकष वापरून करण्यात आली आहे, ज्यात अन्न सुरक्षा, उच्च गुणवत्ता आणि संसाधनांचा योग्य वापर यावर विशेष भर देण्यात आला आहे. नाशिकमधील हा नवीन प्रकल्प अधिक कार्यक्षम पुरवठा साखळी (सप्लाय चेन) सुनिश्चित करेल, ज्यामुळे मालाची ने-आण करण्यासाठी लागणारा वेळ कमी होईल. यामुळे देशभरात पिल्सबरी उत्पादनांची उपलब्धता वाढेल. या सुधारित उपलब्धतेमुळे भारतातील हजारो बेकरी व्यावसायिकांना पिल्सबरीच्या शाश्वत गुणवत्तेचा लाभ घेता येईल. परिणामी त्यांच्या स्वतःच्या प्रगतीला आणि एकूणच बेकरी क्षेत्राच्या विकासाला चालना मिळेल. जनरल मिल्सच्या ग्लोबल इमर्जिंग मार्केट्स विभागाचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक बाल्की राधाकृष्णन यांनी सांगितले की, "नाशिकमधील आमच्या नवीन प्रकल्पाच्या उद्घाटनामुळे देशभर पिल्सबरी उत्पादनांची उपलब्धता वाढवताना आम्हाला अत्यंत अभिमान वाटतो. १९९९ पासून आमचा पिल्सबरी ब्रँड भारतात स्वादिष्ट, दर्जेदार आणि सोयीस्कर बेकिंग मिक्सेस उपलब्ध करून देत आहे. या विस्तारामुळे आम्हाला आमच्या ग्राहकांना आणि बेकरी भागीदारांना अधिक चांगल्या, जलद आणि मोठ्या प्रमाणात सेवा देता येतील."

## श्री गुरु तेग बहादुर साहिबांचा संदेश समाजात पोहोचविण्याचा प्रयत्न-हरजितसिंग बेदी




पुणे (दैनिक संध्या) : श्री गुरु तेग बहादुर साहिबांच्या शिकवणी आणि त्यांचे हौतात्म्याची भावना भावी पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे, या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन कॅम्प येथील गुरुद्वारा गुरुनानक दरबारचे वरिष्ठ विश्वस्त हरजितसिंग बेदी यांनी दिली. श्री. बेदी म्हणाले, साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त त्यांची शहीदी संपूर्ण मानवजातीच्या धार्मिक स्वातंत्र्यासाठी आणि सत्यासाठी होते. खारघर, नवी मुंबई येथे २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी ऐतिहासिक 'हिंद-दी-चादर' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता प्रशासन आणि सिख, सिकलीगर, लबाना, बंजारा, मोहयाल, सिंधी आणि गुरुनानक नाम लेवा संगत-समुदाय एकत्रितपणे जय्यत तयारी करीत आहे. श्री गुरु तेग बहादुर साहिबजीचे त्याग, शौर्य व मानवतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करीत असल्याबद्दल श्री. बेदी यांनी राज्य शासनाचे आभार मानले.

## राज्याच्या डॅशबोर्डवर माहिती उपलब्ध न करून दिल्याने कारवाई होणार

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील नागरी बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची आर्थिक स्थिती आता राज्याच्या डॅशबोर्डवर उपलब्ध झाली असून सुमारे दीड हजार पतसंस्था सहकार विभागाच्या रडारवर आल्या आहेत. पतसंस्थेतील कर्जाची थकबाकी, कर्ज वितरण, सभासदांची संख्या याबाबत कोणतीही माहिती सादर न केल्याने या पतसंस्थांवर आता अवसायनाची कारवाई करण्याचे संकेत सहकार विभागाने दिले आहेत. राज्यातील सर्व २० हजार पतसंस्थांची माहिती एकत्र करण्यासाठी सहकार विभागाने स्वतंत्र पोर्टल तयार केले असून या सर्व पतसंस्थांना १५ डिसेंबरअखेर माहिती या पोर्टलवर अपलोड करण्यास सांगितले होते. त्यापैकी १८ हजार ५१२ संस्थांनीच माहिती सादर केली आहे. पतसंस्थांमधील गैरव्यवहारांवर या निमित्ताने सहकार विभागाचा 'डोळा' राहणार असून पुढील वर्षभरात रिझर्व बँकेसारखी रियल टाईम माहिती दररोज मिळू शकणार आहे. राज्यात सुमारे १३ हजार ४१२ नागरी व ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्था असून सुमारे ६ हजार ५३६ पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्था अशा एकूण १९ हजार ९४८ पतसंस्था आहेत. मात्र. या सर्व पतसंस्थांची एकत्रित माहिती सहकार विभागाकडे उपलब्ध नाही. ती एकत्रितरित्या उपलब्ध करून देण्यासाठी ऑनलाइन एमआयएस प्रणाली सुरू आहे. त्यासाठी या पतसंस्थांना १५ डिसेंबरअखेर माहिती सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यापैकी आतापर्यंत १८ हजार ५१२ पतसंस्थांनी संपूर्ण माहिती सादर केली आहे. राज्यात बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ असून ते या पतसंस्थांवर देखरेख करत असते. मात्र पतसंस्थांकडून मिळणारी आर्थिक माहिती परिपूर्ण नसते. त्यामुळे अनेकदा पतसंस्था बुडीत निघाल्यानंतर किंवा गैरव्यवहार झाल्यानंतरच सहकार विभागाला त्याची माहिती मिळते. तोपर्यंत उशीर झाल्याने सभासदांची हितरक्षण करणे अवघड होते. त्यामुळे पतसंस्थांमधील सर्व आर्थिक माहिती गोळा करण्याच्या उद्देशाने सहकार विभागाने हे एमआयएस पोर्टल सुरू केले आहे. यासंदर्भात उपनिबंधकांना या पतसंस्था बंद आहेत, असे समजून त्यांवर कारवाई करावी, असे आदेश सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी दिले आहेत.

## रिव्हॉल्वर डोक्याला लावणे चांगलेच भोवले

पुणे (दैनिक संध्या) : जादा कर आकारणी केल्याचा आरोप करून महापालिकेच्या कर आकारणी विभागात रिव्हॉल्वर डोक्याला लावून आत्महत्येची धमकी देणाऱ्याच्या विरोधात शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. शुक्रवारी (दि. १३) दुपारी कर आकारणी विभागाच्या कार्यालयात ही घटना घडली. महेंद्र नरसिंग लोणकर (रा. कोंढवा खुर्द) याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याबाबत महापालिकेच्या कर आकारणी विभागातील कर्मचारी गणेश दिलीप ठोंबरे (३७, रा. कात्रज) यांनी शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शुक्रवारी दुपारी सव्वातीनच्या सुमारास महापालिकेच्या कर आकारणी विभागात आला होता. जादा मिळकत कर आकारण्यात आल्याचा आरोप करून कर आकारणी विभागाच्या कार्यालयातून उडी मारण्याची धमकी दिली.

# बसथांबे ते महापालिका इमारती... सौर ऊर्जेतून पुणे होणार हरित शहर

पुणे (दै. संध्या) :

■ सार्वजनिक ठिकाणी सौर प्रकल्प राबवणार – महापौर मंजुषा नागपुरे

■ 'मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६'चे महापौरांच्या हस्ते उद्घाटन




राज्यातील सर्वात मोठ्या 'मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६' या सौर ऊर्जा प्रदर्शनाचे उद्घाटन आज महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. शिवाजीनगर येथील न्यू ॲग्रिकल्चर कॉलेज ग्राउंड येथे सुरू असलेल्या या तीन दिवसीय प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना महापौर नागपुरे यांनी पुण्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जा हा प्रभावी पर्याय असल्याचे सांगितले. बदलत्या हवामान परिस्थिती आणि वाढत्या ऊर्जा गरजांच्या पार्श्वभूमीवर शहरात व्यावहारिक व अंमलात आणता येण्याजोगे सौर प्रकल्प राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

सार्वजनिक ठिकाणे जसे की बसथांबे, उद्याने, सार्वजनिक स्वच्छतागृहे, शासकीय कार्यालये, शाळा, रुग्णालये तसेच महापालिकेच्या इमारतींवर सौर पॅनेल्स बसवून ऊर्जा निर्मिती करता येऊ शकते, असे त्या म्हणाल्या. सौर ऊर्जेवर चालणारे दिवे, सीसीटीव्ही यंत्रणा, डिजिटल माहिती फलक, मोबाईल चार्जिंग स्टेशन यांसारख्या सुविधा उभारल्यास शहर अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पारंपरिक विद्युत ऊर्जेवरील ताण कमी करण्यासाठी आणि प्रदूषणात घट घडवून आणण्यासाठी सौर ऊर्जेचा व्यापक वापर आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. सौर ऊर्जा आणि इतर पर्यावरणपूरक ऊर्जास्रोतांचा समन्वय साधून पुण्याला हरित व स्वयंपूर्ण शहर बनविण्याचा संकल्प महापालिकेने करावा, असे आवाहन त्यांनी केले.

महापौर नागपुरे यांनी महाराष्ट्र सोलर मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना सार्वजनिक-खासगी भागीदारीच्या माध्यमातून प्रायोगिक सौर प्रकल्प राबवून ते टप्प्याटप्प्याने शहरभर विस्तारण्याची तयारी दर्शवली. पुण्याच्या विकासासाठी महापालिका सकारात्मक पावले उचलणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी नगरसेविका मंजुषा खेडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सत्यकी सावरकर, जर्मन इंडो इनोवेशन कॉरिडोर (GIIC) चे संस्थापक उपेंद्र बर्वे, मास्माचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, उपाध्यक्ष प्रदीप खाडे आणि माजी अध्यक्ष शशिकांत वाकडे उपस्थित होते.

प्रदर्शनात सौर ऊर्जा उत्पादनांबरोबरच महावितरण, महाराष्ट्र ऊर्जा विकास एजन्सी (मेडा) तसेच पुणे विद्यापीठाच्या स्कूल ऑफ एनर्जी स्टडीज विभागाचे स्टॉल्स नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. विविध सौर उपकरणे, रूफटॉप सिस्टिम्स, बॅटरी साठवण उपाय आणि ऊर्जा बचत तंत्रज्ञानाबाबत नागरिक माहिती घेत आहेत.

## महिला उद्योजकांच्या डिजिटल आणि उत्पन्न क्षमता मजबूत

पुणे (दै. संध्या) :

डिजिटल अर्थव्यवस्थेत ग्रामीण महिला उद्योजकांना सक्षम करण्यासाठी एक मजबूत पाया रचत, नॅसकॉम फाउंडेशनने टिएटोव्हरीच्या सहकार्याने २५० ग्रामीण महिला उद्योजकांना यशस्वीरित्या प्रशिक्षण दिले, ज्यामुळे त्यांना डिजिटल अर्थव्यवस्थेत अधिक सक्रियपणे सहभागी होता आले. या कार्यक्रमाचा उद्देश व्यावसायिक क्षमता मजबूत करणे आणि महिलांना भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेत सक्रियपणे सहभागी होण्यास सक्षम करणे हा होता.

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील आंबेगाव, चाकण, हवेली, जुन्नर, खेड आणि मंचर ब्लॉकमध्ये राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने हस्तकला, हातमाग, उत्पादन आणि प्रक्रिया क्षेत्रातील महिला उद्योजकांना पाठिंबा दिला, डिजिटल प्रवेशाचे मोजमाप करण्यायोग्य व्यावसायिक परिणामांमध्ये रूपांतर करण्याच्या एका केंद्रित दृष्टिकोनासह.

ग्रामीण महिला उद्योजकांना त्यांच्या व्यवसायांसाठी स्मार्टफोन आणि इंटरनेटचा अर्थपूर्ण वापर करण्यास मदत करण्यासाठी हा उपक्रम डिझाइन करण्यात आला होता, जो व्यावहारिक आणि स्वतंत्र डिजिटल वापराच्या मूलभूत प्रवेशापलीकडे जाऊन आहे. ५० तासांच्या प्रशिक्षकांच्या नेतृत्वाखालील प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे, सहभागींनी डिजिटल आणि आर्थिक साक्षरता, ऑनलाइन पेमेंट, सामाजिक वाणिज्य, डिजिटल मार्केटिंग, ई-अकाउंटिंग आणि संबंधित सरकारी योजनांची जाणीव या विषयांमध्ये प्रत्यक्ष कौशल्ये आत्मसात केली.

## ... तर स्वच्छतागृह सफाईसाठी स्वतः घेणार झाडू हाती

### उपमहापौर परशुराम वाडेकर यांची घनकचरा विभाग प्रमुखांना तंबी

पुणे (दै. संध्या) :



शहरात घनकचरा विभागाचा आंधळा कारभार सुरू असून स्वच्छतागृह आणि कचऱ्याची नियमित स्वच्छता न झाल्यास आपण स्वतः स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यासाठी झाडू हाती घेऊ, अशी तंबी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी घनकचरा विभागाचे प्रमुख अविनाश सपकाळ यांना दिली.

आपल्या पदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर चौथ्याच दिवशी वाडेकर यांनी सकाळी सहा वाजताच सपकाळ आणि क्षेत्रीय आयुक्त नायकर, मुख्य आरोग्य निरीक्षक इनामदार, आरोग्य निरीक्षक विनायक चोपडे, आरोग्य निरीक्षक प्रवीण दरेकर, मुकादम संतोष शेलार, सिद्धार्थ बागुल या अधिकाऱ्यांसह दोन - तीन आरोग्य कोठ्यांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली.

यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांची हजेरी घेतली असता खुद्द आरोग्य निरीक्षक अनुपस्थित असल्याचे आढळले. त्याचप्रमाणे 54 सफाई कर्मचाऱ्यांपैकी केवळ 23 कर्मचारी उपस्थित असल्याचे दिसून आले. मागील हजेरीची पाहणी केली असता कागदावर 100 टक्के उपस्थिती लावल्याचे दिसून आले.

घनकचरा विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे एकमेकात संगनमत होत असून त्यांच्याकडून एकमेकांच्या चुकांवर पांघरून घालण्याचे काम केले जात असल्याचे दिसून आले आहे, त्यातील जे उशिरा आले त्यांच्यावर अधिकाऱ्यांनी दंडात्मक कारवाई केली उर्वरित लोकांवरही कारवाई होणार असल्याचे वाडेकर यांनी नमूद केले.

आरोग्य हा शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. विशेषतः झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांना नरकसदृश परिस्थितीत राहावे लागत आहे. सार्वजनिक शौचालयांची अवस्था अत्यंत बिकट आहे. त्यांची नियमित स्वच्छता केली जात नाही. कचरा पेटीतील कचरा नियमितपणे उचलला जात नाही. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

यासंबंधी घनकचरा विभागातील प्रमुख सपकाळ हे स्वतः उपस्थित असल्यामुळे वस्तुस्थिती त्यांच्या नजरेसमोर आली आहे. कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास त्यांनी सुरुवात केली आहे. घनकचरा विभागाच्या कारभारात त्वरित सुधारणा करण्याचे निर्देश यांना देण्यात आले आहेत, असे परशुराम वाडेकर यांनी सांगितले.

## मुख्यमंत्र्यांच्या आवाहनामुळे ३०५ एकरांवर होणार फळबाग व देशी वृक्षलागवड

पुणे (दै. संध्या) :

**हर्बालाइफ व फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्यात सामंजस्य करार**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हरित वृक्षलागवड वाढवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासोबतच पर्यावरणीय समतोल राखण्याचे केलेले आवाहन हर्बालाइफ (कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रम) आणि 'फार्मर्स फॉर फॉरेस्ट' या संस्थांनी सकारात्मकरीत्या स्वीकारले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या जमिनीवर फळबाग व देशी वृक्षलागवड करण्यासाठी सुमारे ३०५ एकर क्षेत्रावर दीड कोटी रुपयांच्या निधीचा सामंजस्य करार हर्बालाइफ (CSR) आणि फार्मर्स फॉर फॉरेस्ट यांच्यात करण्यात आला आहे.

सद्यस्थितीत पर्यावरणीय समतोल राखणे तसेच शेतकऱ्यांचे शेतीतून मिळणारे उत्पन्न वाढवणे ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनामार्फत विविध पर्यावरणपूरक व शाश्वत शेतीविषयक उपक्रम राबविण्यात येत असून, या प्रयत्नांना बळ देण्यासाठी तसेच शेतकऱ्यांचा सहभाग वाढवून दीर्घकालीन शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम जाहीर करण्यात आला आहे. जैवविविधतेचे क्षेत्र वाढविणे आणि शेतकऱ्यांना दीर्घकालीन उत्पन्न देणारी फळबाग व वृक्षलागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू आहे.

या उपक्रमांतर्गत बीड व पुणे जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या पडीक, कमी कसदार तसेच लागवडीयोग्य शेतजमिनींवर फळबाग व देशी वृक्षलागवड आणि संवर्धनाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये आंबा, लिंबू, संत्रा, मोसंबी, आवळा, जांभूळ, चिंच आदी विविध प्रकारची दर्जेदार कलम केलेली फळझाडे तसेच स्थानिक व पर्यावरणपूरक देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. यासोबतच योग्य बाग व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आंतरपीक पद्धतीने उत्पन्न घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमांतर्गत विकसित होणाऱ्या फळबागांमधून चौथ्या वर्षापासून उत्पन्न सुरू होईल. त्यामुळे सध्याच्या स्थितीत कार्यक्रमात सहभागी शेतकऱ्यांचे प्रतिएकर प्रतिवर्ष सरासरी ₹५०,००० असलेले उत्पन्न वाढून प्रतिएकर प्रतिवर्ष सरासरी ₹२,००,००० पर्यंत पोहोचेल, असा आमचा अंदाज आहे.हर्बालाइफच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व निधीतून शेतकऱ्यांना अनुदान तत्त्वावर दर्जेदार कलमी रोपे, देशी वृक्षांची रोपे, ठिबक सिंचन संच, माती परीक्षण, सेंद्रिय खते तसेच फळबाग लागवडीसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन पुरविले जाणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी 'फार्मर्स फॉर फॉरेस्ट' ही संस्था करणार असून, लागवडीनंतरही शेतकऱ्यांना सातत्यपूर्ण तांत्रिक सहाय्य मिळावे यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात आली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातही खतांचा पुरवठा करण्यात येणार आहे. लागवड करण्यात आलेल्या झाडांची देखरेख व वाढीची नोंद घेण्यासाठी ड्रोनद्वारे छायाचित्रण, उपग्रह माहिती तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे डिजिटल निरीक्षण प्रणाली राबविण्यात येणार आहे. माती परीक्षण व फळबाग लागवडीच्या विविध टप्प्यांवर आवश्यक काळजीविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी वेळोवेळी डिजिटल कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार असून, विविध माध्यमांतून सातत्यपूर्ण तांत्रिक माहिती उपलब्ध करून दिली जाणार आहे.

## वाहतूक नियमनासाठी प्रकल्प राबवावेत - विभागीय आयुक्त

पुणे (दै. संध्या) :



पुणे शहरातील वाहतूक योजनांचे नियोजन, सुसूत्रीकरण आणि अंमलबजावणी करण्यासाठी 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण' समितीची आढावा बैठक विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित करण्यात आली. जास्त प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या ठिकाणांचा प्राधान्यक्रम ठरवून वाहतूक नियमनासाठी प्रकल्प राबवावेत अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. बैठकीला पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पुणे मनपा अपर आयुक्त पृथ्वीराज बी. पी. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त योगेश म्हसे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक नियमन योग्यरितीने होण्यासाठी अधिक प्रमाणात वाहतूक कोंडी होणाऱ्या भागांचा अभ्यास करावा. वाहतुकीचा प्रारंभ व दिशा याचा योग्य अभ्यास करून सर्वेक्षणानुसार प्रकल्पांचे सादरीकरण करावे, असे डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले. यावेळी विश्रांतवाडी, मुंढवा चौक, मार्केट यार्ड ते सेव्हन लव्हज चौक, गोळीबार मैदान, घोरपडी ब्रीज, मगरपट्टा परिसरातील सार्वजनिक वाहतूक, कॉरिडॉर, डबल डेकर टनेल, पीएमपीएलच्या नवीन बसेस साठी पार्किंगसाठी जागा उपलब्ध करण्याचे नियोजन आदींबाबत चर्चा करण्यात आली.

## तेजस नेरूरकर दिग्दर्शित "तुरु तुरू" गाण्याने १ मिलियन व्ह्यूजचा टप्पा केला पार

# व्हलेंटाईन डे दिवशी सोशल मीडियावर गाणं ट्रेंडींगवर

पुणे (दै. संध्या) :

कृष्ण मुरारी, सुंदरा, दर्याचं पाणी, लई भारी दिसते पोर तसेच आता नुकतच आलेलं गायिका सई गोडबोलेच्या सुमधुर आवाजातील साईरत्न एंटरटेनमेंट प्रॉडक्शनची निर्मिती असलेलं "तुरु तुरू" गाणं नुकतंच प्रदर्शित झालं असून हे गाणं तब्बल दोन दिवसात १ मिलियन व्ह्यूज पार गेलं आहे. या गाण्याला सोशल मीडियावर लोकांची चांगलीच पसंती मिळत आहे. या गाण्यात बिग बॉस फेम अभिनेता आयुष संजीव आणि अभिनेत्री हेमल इंगळे आहेत. तसेच गायिका सई गोडबोले व गायक निहार शेंबेकर आणि शार्क यांनी हे गाणं गायलं आहे. विकास साटम हे या गाण्याचे गीतकार आहेत. तेजस नेरुरकरच्या दिग्दर्शनाखाली तयार झालेल्या या गाण्याला प्रसिद्ध संगीतकार निहार शेंबेकर आणि शार्क यांनी संगीत दिलं आहे. पूजा काळेने या गाण्याचे नृत्य दिग्दर्शन केले आहे. अभिनेत्री हेमल इंगळे गाण्याच्या प्रोसेसविषयी सांगते, "मी साईरत्न एंटरटेनमेंटचे मनापासून आभार मानते की त्यांनी मला या गाण्यात काम करण्याची संधी दिली. माझी प्रेक्षकांना विनंती आहे की तुम्ही या गाण्याला भरभरून प्रेम द्या. या गाण्याचे दोन दिवसात एक मिलियन व्ह्यूज पूर्ण झाले आहेत. त्यामुळे मी सर्व रसिक प्रेक्षकांचे मनापासून आभार मानते. या गाण्यावर सुंदर रील व्हिडिओ बनवा. आणि मला जरूर टॅग करा." गायक व संगीतकार निहार शेंबेकर या गाण्याच्या रेकॉर्डिंग विषयी सांगतात, "मराठीतलं हे पहिलंच गाणं आहे जे आफ्रिकन रीदम मधील बायले फंक या जॉनरवर केलं गेलं आहे. तसेच तुम्हाला गाणं बघताना असंच वाटेल की हेमल खरंच गात आहे. हेमलला सईचा आवाज परफेक्ट मॅच झाला. मला खात्री आहे की तुम्हालाही हे गाणं खूप आवडेल. तुम्ही थिरकणार आहात या गाण्यावर. तुम्हाला हे गाण कस वाटल हे आम्हाला कमेंट्सद्वारे जरूर कळवा."



## थोडक्यात पण महत्वाचे...



### देशी गोवंश संवर्धन आणि दूध उत्पादन वाढीस चालना मिळण्यास मदत

पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीअंतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, कृषी महाविद्यालय, पुणे व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ, पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानासाठी 'महापशुधन एक्सपो' परळी वैजनाथ येथे महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे, अशी माहिती देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी दिली आहे. यावेळी पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे आदी उपस्थित होते. श्री. माने म्हणाले, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी व महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञान व इन-विट्रो फर्टिलायझेशन तंत्रज्ञानाच्या संयुक्त अंमलबजावणीसाठी हा करार करण्यात आला, यामुळे राज्यातील देशी गोवंश संवर्धन आणि दूध उत्पादन वाढीस चालना मिळण्यास मदत होणार आहे. कृषी विद्यापीठाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून गोवंश संवर्धन व सुधारणा कार्यक्रमांतर्गत भ्रूण प्रत्यारोपण तंत्रज्ञानाचा वापर करून उच्च वंशावळीच्या व जास्त दूध उत्पादन देणाऱ्या देशी गायी निर्माण करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रावर १०० पेक्षा अधिक उच्च वंशावळीच्या देशी गाईंच्या कालवडींचा यशस्वी जन्म झाला असून, हा उपक्रम राज्यातील पशुधन विकासासाठी मैलाचा दगड ठरत आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत स्थापन करण्यात आलेल्या 'ईटी-आयव्हीएफ' प्रयोगशाळेद्वारे राज्यभरात देशी गाईंच्या उच्च वंशावळीच्या कालवडी तयार केल्या जात आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत सहीवाल, गिर, राठी, रेडसिंधी व थारपारकर तसेच खिल्लार व डांगी या दुधाळ देशी जातींच्या उच्च जनुकीय क्षमतेच्या कालवडी शेतकऱ्यांच्या बांधावरच तयार करण्यात येणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या गाईंची दूध उत्पादकता वाढविण्यास थेट मदत होणार असून दुग्धव्यवसाय अधिक लाभदायक होणार आहे.

### डिजिटल इंडियाच्या दिशेने पाऊल टाकून स्वतःची ओळख निर्माण करावी

पुणे (दैनिक संध्या) : कौशल्य विकासाच्या योजनेच्या माध्यमातून कारागिरांना स्वावलंबनाची संधी उपलब्ध झाली आहे; डिजिटल इंडियाच्या दिशेने प्रत्येक विश्वकर्माने पाऊल टाकून स्वतःची ओळख निर्माण करावी,असे आवाहन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रवींद्र साठे यांनी केले. भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या विकास व सुविधा कार्यालय, मुंबई आणी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान कौशल्य सन्मान योजनेअंतर्गत १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ दरम्यान सोनल हॉल प्रदर्शन सेंटर, कर्वे रोड येथे आयोजित विश्वकर्मा कारागिरांच्या राज्यस्तरीय प्रदर्शन, विक्री व प्रोत्साहन कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयाच्या विकास व सुविधा कार्यालयाचे संचालक मिलिंद बारापत्रे, इंडो जर्मन टूल रूमचे उपाध्यक्ष सुहास इंगळे, एक्सेलन्सीचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकांत सारडा, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक अर्चना कोठारी, एमएसएमईचे सहसंचालक अभय दफ्तरदार, जिल्हा सुकाणू समिती सदस्य विकास जगताप, धर्मेंद्र खांडरे आदी मान्यवर उपस्थित होते. श्री. साठे यांनी 'लोकल फॉर व्होकल' संकल्पनेद्वारे विश्वकर्मा कारागिरांनी दर्जेदार उत्पादने निर्माण करून देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळवावे तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया आणि विश्वकर्मा योजना राबविण्यात येत आहेत. ते पुढे म्हणाले, विश्वकर्मा कारागिरांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे व त्यांचे सक्षमीकरण करणे हा या प्रदर्शनाचा प्रमुख उद्देश होता. प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून पुणेकरांनी या तीन दिवसीय मेळाव्यास भेट देऊन स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन श्री. साठे यांनी केले. प्रदर्शनामध्ये सुतारकाम, लोहारकाम, सोनारकार, माळाकार, कुंभार, शिल्पकार, शिवणकाम , चर्मकार, बुटिक काम, कोरीव दगड काम, खेळणी आदी विविध पारंपरिक व्यवसायातील एकूण ६७ स्टॉल्स सहभागी झाले होते. कोल्हापुरी चप्पल, पर्स, दर्जेदार बुटिक साड्या, गारमेंट वस्तू तसेच महिलांसाठी आकर्षक दागिने यांना विशेष प्रतिसाद मिळत आहे.

# विलास आर पाटील यांना आर्थिक फसवणूक प्रकरणी अटक

भिवंडी (दै. संध्या) :

- महापौर निवडणुकीच्या राजकीय नाट्याला कलाटणी
- महापौर निवडणुकीत उमेदवारी साठी अर्ज दाखल करण्यासाठी मुभा मिळावी म्हणून न्यायालया समोर अर्ज



भिवंडीतील कोणार्क विकास आघाडीचे माजी महापौर विलास आर. पाटील यांना एक कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणूक प्रकरणी ठाणे पोलिस आयुक्तालयातील आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने शुक्रवारी रात्री अटक केली आहे.त्यांना शनिवारी सुट्टीच्या न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने विलास पाटील यांना चार दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे.

विलास पाटील यांच्या अटकेनंतर भिवंडी पालिका महापौर पदाच्या निवडणुकीच्या राजकीय नाट्याला कलाटणी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात विलास पाटील यांच्याकडून न्यायालयासमोर १६ फेब्रुवारी रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सवलत मिळण्यासाठी अर्ज करण्यात आला आहे.

महानगरपालिका निवडणुकीनंतर विलास पाटील व भाजपा आमदार महेश चौघुले यांच्या गटात छत्रपती शिवाजी महाराज चौकात १८ जानेवारी रोजी हाणामारी व राडा झाला होता.या प्रकरणात विलास पाटील फरार होते.त्यांना ७ फेब्रुवारी रोजी अटकपूर्व जामीन मंजूर झाला होता.विलास पाटील हे भिवंडी महानगरपालिका राजकारणात नेहमी किंग मेकरच्या भूमिकेत राहिले आहेत. आता सुद्धा त्यांनी महापौर पदाच्या निवडणुकीसाठी शिवसेना शिंदे गटासोबत जवळीक वाढलेली असून, सदस्यांची जमवाजमव सुरू केली होती.

विलास पाटील यांच्या अटकेच्या बातमी नंतर भिवंडीत शिवसेना शिंदे गटाकडून भादवड,टेमघर, नवीबस्ती या परिसरात नगरसेवक बाळाराम चौधरी,रोहित चौधरी व दिनमोहमद यांनी रस्त्यावर उतरून दुकाने बंद करण्यास सुरुवात केली होती.

बांधकाम व्यावसायिक ब्रिजेश प्रताप सिंह व विकासक नवलकिशोर सोनी यांची व्यावसायिक ओळख झाल्यावर नवलकिशोर सोनी यांनी मौजे पोगाव येथील सर्व्हे क्रमांक ८१/६,१०४/१, १०४/२ मधील ७०४३ चौरस मीटर व सर्व्हे क्रमांक ९९,१६,१७,२४ मधील ६१११ चौरस मीटर जागा विकसित करायची असून त्यामध्ये भागीदार म्हणून ब्रिजेश सिंह यांना घेऊन नवल सोनी यांनी त्यांच्या जवळून २५ सप्टेंबर २०१४ मध्ये एक कोटी रुपये आपल्या सुमित प्रॉपर्टी डेव्हलपर्स या बँक खात्यात जमा केले.या जमिनीपैकी सर्व्हे क्रमांक ८६/६ मधील १७२६ चौरस मीटर जागा विलास पाटील यांच्या पत्नी माजी महापौर प्रतिभा पाटील यांना विक्री करून त्यांच्या जवळून १ कोटी ८ लाख ७७ हजार ५८० रुपये घेऊन नवलकिशोर सोनी यांनी सदर रक्कम सुमित प्रॉपर्टी डेव्हलपर्सच्या नावे घेऊन नंतर ही रक्कम आपल्या मालकीच्या श्री राधे रियलेटर्स प्रा. लि.या कंपनीच्या नवे वळवून घेत आपली व कंपनीची फसवणूक केल्याबाबत ब्रिजेशप्रताप सिंह यांनी १९ जून २०२५ मध्ये निजामपूर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून आर्थिक फसवणुकीचा गुन्हा नवलकिशोर सोनी विरोधात दाखल करून या गुन्ह्याचा तपास ठाणे आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला होता.

#### अटक राजकीय हेतूने पूर्वग्रहदूषित : अँड नारायण अय्यर

२०२५ मध्ये निजामपूर पोलिस ठाण्यात आर्थिक फसवणूक प्रकरणी दाखल गुन्ह्याचा तपास करणाऱ्या आर्थिक गुन्हे शाखेने शुक्रवारी रात्री विलास पाटील यांना अटक केली आहे.या गुन्ह्यात विलास पाटील यांचा कोणताही संबंध नाही.दाखल गुन्ह्यात सुद्धा त्यांचे नाव समाविष्ट नसताना हा गुन्हा राजकीय हेतूने प्रेरित असून यामध्ये विलास पाटील यांना नाहक गोवण्यात आला असल्याचा आरोप विलास पाटील यांचे वकील अँड. नारायण अय्यर यांनी केला आहे. यावर न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी ठोठावली आहे.दरम्यान भिवंडी महानगरपालिका महापौर पदाच्या निवडीसाठी १६ फेब्रुवारी रोजी मुभा मिळावी असा अर्ज सुद्धा न्यायालयासमोर केल्याची माहिती अँड.नारायण अय्यर यांनी दिली आहे.

# "T20 वर्ल्ड कप जिंकण्याचं गुपित काय?




- रॉयल स्टॅगकडून रोहित शर्मा आणि पॅडी अपटोन सोबत #RS कोडचा खुलासा!"
- ही मोहीम यशाच्या चार तत्त्वांमधून यशाचा अर्थ उलगडते— आणि चाहत्यांना AI-सक्षम टूलच्या माध्यमातून त्यांच्या स्वतःच्या यशाची वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचे आमंत्रण देते.

नवी दिल्ली (दै. संध्या) :

क्रिकेटचा उत्साह शिगेला असताना, सीग्राम्स रॉयल स्टॅग पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटरने रॉयल स्टॅग कोड ऑफ लार्ज (#RS कोड) हा अभिनव, डेटा-आधारित उपक्रम ब्रँड ॲम्बेसेडर आणि भारतीय संघाचा माजी कर्णधार रोहित शर्मा तसेच मेंटल कंडिशनिंग प्रशिक्षक पॅडी अपटोन यांच्या सहकार्याने सादर केला आहे, हा उपक्रम केवळ यश साजरे करण्यापुरता मर्यादित नसून, त्यामागील सूत्र उलगडण्याचा प्रयत्न आहे. रोहित शर्मा, दोन ICC T20 वर्ल्ड कप जिंकणारा एकमेव भारतीय खेळाडू, निर्भीड व्यक्तिमत्व आणि यशाचे प्रतीक आहे — स्वतःच्या पद्धतीने, प्रामाणिकपणे आणि रॉयल स्टॅगच्या 'लिव्हिंग इट लार्ज' तत्त्वज्ञानाशी पूर्णपणे सुसंगत असा जीवनमार्ग जगणारा आहे.

#RSकोड हा रोहित शर्मा यांच्या कारकिर्दीचा सखोल डेटा विश्लेषण करून तयार करण्यात आलेला परिणाम आहे, ज्यामध्ये डेटा सायन्सचा वापर करत रॉयल स्टॅगच्या 'क्षणाचा आनंद घेणे' आणि 'लिव्हिंग इट लार्ज' या तत्त्वज्ञानाशी सुसंगत ब्रँड मूल्यांचा समन्वय साधण्यात आला आहे. या प्रक्रियेतून यश उलगडण्याचा पाया घालणारे 4 वेगळे व्यक्तिमत्त्व गुण समोर आले, ज्यांची अभिव्यक्ती प्रत्येक व्यक्तीनुसार वेगळी असू शकते.

रोहित शर्माच्या यशामागे सातत्याने उभी असलेली चार ठळक वैशिष्ट्ये हीच त्यांच्या यशाचा पाया आहेत आणि ते रॉयल स्टॅगच्या दीर्घकालीन तत्त्वज्ञानाचे खरे प्रतिबिंब आहेत.

या संपूर्ण उपक्रमाला विश्वासार्हता देण्यासाठी, मोहिमेत पॅडी अपटोन यांचा समावेश करण्यात आला आहे.

विषयतज्ज्ञ म्हणून ते या उपक्रमाचे नेतृत्व करत कामगिरीसंबंधित डेटाचे अर्थपूर्ण आकलन आणि दृष्टिकोन यांमध्ये रूपांतर करतात.

हा #RSकोड चार गुणांवर आधारित आहे. निःस्वार्थीपणा, जिथे वैयक्तिक टप्प्यांपेक्षा टीमचे यश नेहमीच अधिक महत्त्वाचे ठरते; उत्साह, जिथे प्रत्येक क्षण साजरा केला जातो आणि तो नव्या सुरुवातीची पायरी मानला जातो; निर्भीडपणा, जो वाढत्या जबाबदाऱ्यांशी जुळवून घेण्याची क्षमता तपासतो; आणि प्रेरणादायी, जिथे नेतृत्व केवळ प्रेरणादायी नसून एकमेकांकडे जाणारे ठरते. हे सर्व मिळून रॉयल स्टॅग कोड ऑफ लार्ज, #RSकोड हे तत्वज्ञान तयार करतात जे केवळ क्रिकेटपुरती मर्यादित नसून जीवनालाही तितकेच लागू पडतात.

#RSकोड ही एक टप्प्याटप्प्याने साकारलेली, डिजिटल पद्धतीची प्रथम मोहिम आहे जी उत्सुकता आणि सहभाग वाढवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याची सुरुवात रोहित शर्मा आणि पॅडी अपटोन यांच्या टीझरने झाली, ज्याने RS कोडबद्दल उत्सुकता निर्माण केली.

# तांड्यापासून अंतराळापर्यंत : ग्रामीण विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना शासनाची साथ

## इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे : अंतराळ संशोधन क्षेत्रात ग्रामीण विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी इस्रो विज्ञान सहल

- विज्ञान प्रेरणा अभियानांतर्गत 'विजाभज' आश्रमशाळेतील १०० विद्यार्थी सहलीत सहभागी होणार

मुंबई (दै. संध्या) :

इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "विज्ञान प्रेरणा अभियान" अंतर्गत विजाभज आश्रमशाळांमधील १०० गुणवंत विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) येथे विशेष शैक्षणिक विज्ञान सहलीचे १५ ते २० फेब्रुवारी २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आल्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

मंत्री सावे म्हणाले, ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाविषयी जिज्ञासा, संशोधनाची वृत्ती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात अंतराळ संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असून त्या संधीं ग्रामीण विद्यार्थ्यांना प्राप्त होण्यासाठी शासनाने विशेष उपक्रम हाती घेतला.

मंत्री सावे म्हणाले, राज्यातील विविध 'विजाभज' आश्रमशाळांमधून गुणवत्ता परीक्षेद्वारे १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना इस्रो येथे भेट देऊन उपग्रह निर्मिती, प्रक्षेपण तंत्रज्ञान, प्रत्यक्ष रॉकेटचे प्रक्षेपण पाहणे आणि अंतराळ संशोधन प्रकल्पांविषयी प्रत्यक्ष माहिती घेण्याची संधी मिळणार आहे. तसेच विज्ञानविषयक कार्यशाळा आणि शास्त्रज्ञांशी, तज्ज्ञांशी संवादाच्या माध्यमातून त्यांना अनुभवाधारित शिक्षणाचा लाभ होणार आहे.

ग्रामीण विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील वैज्ञानिक संस्थांशी जोडणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आणि उच्च शिक्षणाच्या संधींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांचा प्रवास विमानाने होणार असून त्यांच्या सुरक्षित व सुसूत्र प्रवासाची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्ट दर्जाची निवास व्यवस्था करण्यात आली असून दररोज आवश्यक सर्व सुविधा व साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती विभागामार्फत देण्यात आली आहे. असा उपक्रम विभागामार्फत पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे.

राज्यातील ९८० विजाभज आश्रमशाळांमधून इयत्ता ९ वी व ११ वीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा घेण्यात आली. त्यातून ५० विद्यार्थी व ५० विद्यार्थीनी अशा एकूण १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

सहलीचे नियोजन :-

विद्यार्थी १५ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी या कालावधीत पुणे, बेंगलुरू, त्रिवेंद्रम, कन्याकुमारी या शहरातील विविध ठिकाणांना भेटी देणार आहेत.

- १५ फेब्रुवारी रोजी पुणे - पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क व नॅशनल वॉर मेमोरियल येथे भेट. १६ फेब्रुवारी पुणे - भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था (IISER) येथे प्रयोगाधारित विज्ञान कार्यशाळा व शास्त्रज्ञांशी संवाद.
- १६ फेब्रुवारी रोजी पुणे विमानतळावर मंत्री अतुल सावे व विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून इस्त्रो दौऱ्यासाठी हिरवी झेंडी दाखवणार आहेत. १७ फेब्रुवारी बंगळुरू – विश्वेश्वरय्या औद्योगिक व तंत्रज्ञान संग्रहालय, हिंदुस्तान विमान निर्मिती वारसा संग्रहालय व लालबाग वनस्पती उद्यान भेट. १८ फेब्रुवारी तिरुवनंतपुरम (थुंबा) - भारतीय अंतराळ संशोधन संस्था केंद्र, उपग्रह प्रदर्शन विभाग व प्रक्षेपण तंत्रज्ञान गॅलरी भेट; रॉकेट प्रक्षेपणाचे अवलोकन. तसेच नेपियर संग्रहालय व कोवलम समुद्रकिनारा भेट.
- १९ फेब्रुवारी कन्याकुमारी - पद्मनाभपुरम राजवाडा, विवेकानंद शिला स्मारक, तिरुवल्लुवर पुतळा, गांधी स्मारक तसेच सूर्यास्त दर्शन.

# पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचे प्रदर्शन व मेळावा उद्घाटन कार्यक्रम संपन्न

नवी दिल्ली (दै. संध्या) :




दि.१३/०२/२०२६ ते १५/०२/२०२६ या तीन दिवसाचे पंतप्रधान कौशल्य सन्मान योजनेतील पात्र विश्वकर्माचे राज्यस्तरीय प्रदर्शन व विक्री व प्रोत्साहन कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. रवींद्र साठे अध्यक्ष, (राज्य मंत्री दर्जा) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ ,मुंबई यांचे शुभहस्ते सोनल हॉल प्रदर्शन सेंटर, कर्वे रोड येथे संपन्न झाले.

सदर उपक्रम भारत सरकारचे सुक्ष्म लघु व मध्यम मंत्रालय विकास व सुविधा कार्यालय मुंबई व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,पुणे यांच्या संयुक्त माध्यमातून आयोजित करण्यात आले. यामध्ये विश्वकर्मा योजनेतील विश्वकर्मा कारागिरांचे सक्षमिकरण करण्याचे उदिष्ठानुसार त्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सुतारकाम (५ )लोहार (२)सुवर्णकार(१०),माळाकार(२) कुंभार(५)शिल्पकार(१) शिवणकाम(गारमेन्ट),(२०),चर्मकार (५),बुटिककाम (2),कोरीव दगड काम ,खेळणी स्टॉल (२) ,एकूण स्टॉल 67 विश्वकर्मानी या प्रदर्शनात सहभाग घेऊन ,कोल्हापुरी चप्पल ,पर्स ,दर्जेदार बुटिक साड्या ,गारमेन्ट वस्तु व महिलांसाठी सुवर्णकारांनी केलेले दागिने लक्ष वेधून घेत आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर मान्यवरांचे हस्ते महात्मा गांधी यांचे प्रतिमेस सुतिहार अर्पण करून दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथि मा श्री. रवींद्र साठे (सभापती) महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांचे स्वागत एम. एस. एम. इ ,डि .एफ .ओ मुंबई, संचालक श्री. मिलिंद बारापत्रे यांनी केले तसेच व्यापीठावर श्री. सुहास इंगळे उपाध्यक्ष इंडो जर्मन टूल रूम व श्रीकांत सारडा, मॅनेजिंग डायरेक्टर, एक्सेलन्सी यांचा ही सत्कार श्री.बारापत्रे यांनी केला तसेच जिल्हा सुकाणू समितीचे सदस्य श्री विकास जगताप व श्री. धर्मेंद्र खांडरे यांचे स्वागत मंडळाचे सभापती श्री. रवींद्र साठे यांनी केले. तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक् श्रीमती .कोठारी मॅडम यांचे व एम एस एम ई चे सहसंचालक श्री. अभय दफ्तरदार यांनी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. रमेश सुरुंग यांचे स्वागत केले. तसेच मंडळाचे सभापती श्री .रवींद्र साठे यांनी श्री.अभय दफ्तरदार यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अभय रावेतकर राज्य समन्वयक पी. एम. विश्वकर्मा योजना यांनी केले. या कार्यक्रमामध्ये प्रस्ताविक श्री. अभय दफ्तरदार, सहसंचालक, डि एफ ओ मुंबई यांनी करून कार्यक्रमाची भूमिका सांगीतली व महाव्यवस्थापक् श्रीमती.कोठारी मॅडम यांनी ,शासनाच्या योजना सागुण त्यांचा लाभ घेण्याचे अवाहन केले. तसेच एम. एस. एम. इ चे संचालक श्री. बारापत्रे यांनी प्रदर्शन व मेळावा यांचे महत्व विषद करून माहिती दिली. जिल्हा सुकाणू समितीचे सदस्य श्री. विकास जगताप यांनी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची ही योजना देशास देण्याची भूमिका सांगितली या कार्यक्रमात उद्घाटन पर भाषणामध्ये श्री. रवींद्र साठे, सभापती, खादी ग्रामोद्योग (महाराष्ट्र राज्य )यांनी प्रदर्शनातून शासनाचा उद्देश विषेद करून लोकल फॉर वोकल मधून विश्वकर्मा कारागीरांचा विकास व्हावा व देशातील वस्तूंना देशात व अंतराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्याचा हा उद्देश आहे. यासाठी विश्वकर्मानी जागरूक होऊन दर्जेदार वस्तु निर्माण करून स्वावलंबी कुटुंब करून विकास साधावा व आपले कलाकारी चे सामर्थ्यांचे या ठिकाणी दर्शन होत आहे. ते ओपन मार्केट मध्ये ठेवून कलागुनाना वाव द्यावा असे सांगीतले व उद्योजक अंतराष्ट्रीय कसे निर्माण झाले व आपण कसे पुढील ध्येय साध्य कारायची या विषयाची जगातील उदाहरणे दिली व मा . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला प्रथम स्टार्टप अप इंडिया नंतर मेक इन इंडिया, विश्वकर्मा या योजना निर्माण करून कारागीराच्या स्वप्नांना उभारी दिली आहे. त्यांचा फायदा हा जनतेनी घेऊन उत्तम उद्योजक होऊन देशसेवा केली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने भारत देश सक्षम होईल व आपण समृद्धीच्या मार्गाने जावून खऱ्या अर्थाने आपला व देशाचा विकास होईल हिच या प्रदर्शन व विक्री मेळाव्यांचे साध्य आहे. असे प्रतिपादन केले व डिजिटल इंडिया च्या दिशेने प्रत्येक. विश्वकर्मा यांनी पाऊल टाकून. आपली ओळख निर्माण करावी असे सांगीतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री .अभय रावेतकर राज्य समन्वय(मुंबई) पि. एम .विश्वकर्मा यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. रमेश सुरुंग जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ,पुणे यांनी केले व प्रदर्शन सर्वांसाठी खुले आहे . सर्वांनी या तीन दिवसीय प्रदर्शन मेळाव्यास भेट देवून पुणेकरांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे अवाहन केले.

# अपघात रोखण्यासाठी कठोर पावले!

## पुणे वाहतूक पोलिसांचा इशारा; नियम तोडल्यास थेट दुचाकी जप्त होणार?

पुणे (दै. संध्या) :



एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास करणाऱ्या 'ट्रिपल सीट'सह अन्य प्रकारचे वाहतूक नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध वाहतूक पोलिसांनी कारवाईचा धडाका कायम ठेवला असून गेल्या दोन दिवसात वाहतूक पोलिसांनी वाहतूक नियमांचा भंग करणाऱ्यांच्या ९८८ दुचाकी ताब्यात घेतल्या आहेत. या बेशिस्त दुचाकीस्वारांकडून २१ लाख ३७ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. भरधाव, व बेशिस्त दुचाकीस्वारांमुळे गंभीर स्वरूपाचे अपघात घडतात. एकाच दुचाकीवरून तिघांचा प्रवास अशा प्रकारचा नियमभंग करणाऱ्या दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाई तीव्र केली आहे. गेल्या दोन दिवसांत दोन हजार ६४९ दुचाकीस्वारांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केली. तर ९८८ दुचाकी ताब्यात घेतल्या. ताब्यात घेतलेल्या दुचाकी कागदपत्रांची पूर्तता, थकीत दंड भरल्यानंतर ताब्यात देण्याची प्रक्रिया टप्याटप्याने पार पाडण्यात येणार आहे, अशी माहिती वाहतूक शाखेचे पोलिस उपायुक्त हिंमत जाधव यांनी दिली. आतापर्यंत विशेष मोहिमेद्वारे वाहतूक पोलिसांनी ट्रिपल सीट, तसेच अन्य प्रकारचे वाहतूक नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांकडून एक कोटी तीन लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

महानिर्मिती — महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

इ-निविदा सूचना
क्र.ना.औ.वी.कें/२०२५-२६/७२

| अ. क्र. | निविदा क्र./ विभाग | निविदा तपशील | अंदाजे रक्कम (रु.) / इसारा रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| १. | ३००००६५९२७ / बीएम | २१० एम डब्लु बॉयलर चे आयडी, पीए फॅन लवचिक पिन बुश प्रकारचे कपलिंगसेट बुश/ पिन, बोल्ट, नट सह खरेदी करणे. | १४,०७,०००/- / १७,६००/- |
| २. | ३००००६५९२६ / सीएचपी | कन्व्हेयर १७ए वर कन्व्हेयर सुरक्षा उपाय प्रदान करण्याचे आणि निश्चित करण्याचे काम. | २०३,०४,३९०/- / २,०६,६००/- |

नविन विक्रेते / नोंदणी नसलेल्या विक्रेत्यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या कंपनीची ई-टेंडरिंगसाठी नोंदणी करावी.
अधिक तपशीलांसाठी वेबसाइटवर लॉग इन करा.
प्रत्येक निविदा किंमत रू. ११८०/- , अधिक माहिती व अद्यतनांसाठी कृपया https://eprocurement.mahagenco.in येथे भेट द्यावी.

मुख्य अभियंता,
नाशिक औ.वि.केंद्र, एकलहरे

## थोडक्यात पण महत्वाचे...




### आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याबाबत अर्ज स्वीकारण्यास सुरुवात

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन NC मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी तसेच उर्वरित क्रमांकांसाठी दुचाकी वाहनांबाबत आगाऊ अर्ज स्वीकारून लिलाव पद्धती राबविण्यात येणार आहे. दुचाकी वाहनांच्या नव्या मालिकेची सुरुवात लवकरच करण्यात येणार असून, वाहनधारकांना आकर्षक व पसंतीचे क्रमांक उपलब्ध करून देण्यासाठी ही कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यास इच्छुक वाहनमालकांनी दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. उर्वरित आकर्षक नोंदणी क्रमांक आरक्षित करण्यासाठी इच्छुकांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.३० या वेळेत अर्ज करावेत. संबंधित अर्ज नव्या वाहन नोंदणी विभागात सादर करावेत. अर्जासोबत ओळखपत्र, पत्त्याचा पुरावा, आधारकार्ड, पॅनकार्ड इत्यादी कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जदारांनी विहित शुल्कासह अर्ज सादर करावा. प्राप्त अर्जांवर नियमानुसार कार्यवाही करून आवश्यक असल्यास लिलाव पद्धतीने क्रमांक निश्चित करण्यात येईल. याबाबत अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे संपर्क साधावा, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड यांनी दिली आहे.




### पिंपरी-चिंचवडमध्ये क्षेत्रीय कार्यालये 8 वरून 10 करण्याची मागणी; आयुक्तांचा नकार

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दैनंदिन कामकाज सुरळीत व्हावे, म्हणून गेल्या पंचवार्षिकेत सहा क्षेत्रीय कार्यालयांचे आठ क्षेत्रीय कार्यालय करण्यात आले. आताही नगरसेवक संख्या पूर्वीप्रमाणे 128 असताना आठ क्षेत्रीय कार्यालयांचे दहा श्रेत्रीय कार्यालय करण्याची मागणी भाजपाच्या सत्ताधाऱ्यांच्या एका गटाकडून करण्यात आली आहे. मात्र, ते शक्य नसल्याचे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले आहे. आता, सत्ताधारी भाजपाकडून काय भूमिका घेतली जाणार, याची उत्सुकता आहे. फेबुवारी 2017 च्या निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार झाली. जागा 128 होत्या. त्यासाठी पूर्वीची वॉर्ड रचना फोडून नव्याने 32 प्रभाग करण्यात आले. निवडणुकीनंतर शहरातील क्षेत्रीय कार्यालयांची फेररचना करण्यात आली. सहा क्षेत्रीय कार्यालय फोडून आठ क्षेत्रीय कार्यालये करण्यात आली. शहरात 9 ऑगस्ट 2017 ला आठ क्षेत्रीय कार्यालयांची स्थापना झाली. राजकीय फायद्यासाठी सर्व आठही क्षेत्रीय कार्यालयांच्या अध्यक्षपदी भाजपाचे नगरसेवक बसतील, अशी व्यवस्था करण्यात आली. विरोधात असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने त्या नव्या क्षेत्रीय कार्यालयाच्या रचनेला विरोध केला नाही. त्या निवडणुकीनंतर तब्बल 9 वर्षांने महापालिकेची निवडणूक झाली. मात्र, नगरसेवक संख्या 128 पूर्वी इतकी कायम आहे. तसेच, प्रभाग रचनाही जुनीच आहे. पुन्हा महापालिकेत भाजपाची सत्ता आली आहे. भाजपाचे अपक्ष धरून एकूण 85 नगरसेवक संख्या आहे. क्षेत्रीय कार्यालय ताब्यात असावी. तसेच, अधिकाधिक नगरसेवकांना क्षेत्रीय अध्यक्षपद भूषवता यावे म्हणून आणि राजकीय सोय पाहण्यासाठी आठ क्षेत्रीय कार्यालयांचे दहा क्षेत्रीय कार्यालय करण्याची मागणी सत्ताधारी भाजपाकडून करण्यात आली आहे.



### कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांवर रात्रपाळीची सक्ती; सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

खराळवाडी (दैनिक संध्या) : पिंपरी शहर, उपनगरांतील कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांवर आरोग्य विभागाकडून मागील सहा महिन्यांपासून रात्रपाळीची ड्युटी लावण्यात आली आहे. यामुळे महिल्यांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. महापालिका आरोग्य विभागाकडून मोठा अन्याय केला जात आहे. यामुळे महिला कर्मचाऱ्यांच्या कामाच्या ड्युटीमध्ये बदल करावा, अशी मागणी होत आहे. महापालिकेच्या आरोग्य विभागात कंत्राटी महिला सफाई कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार न मिळणे, कामावरून अचानक काढून टाकणे, कामाच्या ठिकाणी गैरवर्तन, कमी वेतन आणि सुविधांचा अभाव, इतर कायद्यानुसार मिळणाऱ्या सुविधा न देणे यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. घरामध्ये त्यांना वेळ देण्यासाठी शिफ्टमध्ये काम करणे सहाजिक होते; परंतु आरोग्य विभाग त्यांच्या सामाजिक-आर्थिक समस्यांकडे दुर्लक्ष करून त्यांच्यावर सतत रात्रपाळीची ड्युटी लादत आहे. तरी सफाई महिला कर्मचाऱ्यांनी ड्युटी बदलून मागितली तर अचानक त्यांना पूर्वसूचना न देता कामावरून कमी केले जाते. वेतनात काटकसर करून वेतन पुढे ढकलणे या सारख्या अडचणीचा सामना करावा लागतो. तरी महापालिका आरोग्य विभागाने या कंत्राटी महिला साफसफाई कर्मचाऱ्यांची तात्काळ दखल घ्यावी, अशी मागणी सफाई कामगार संघटनेने महापालिका प्रशासनाकडे केली आहे. आम्हाला गेले सहा महिने झाले रात्रपाळीची ड्युटी जबरदस्तीने लादली आहे. रात्रपाळीला ड्युटीला येताना चौकाचौकांत तळीराम बसलेले असतात. त्याची भीती वाटते. शिवाय रात्रपाळीला काम, दिवसा मुलांची शाळा त्यांची तयारी, घरातील जबाबदारी यामुळे दैनंदिन शिफ्टमध्ये काम असावे, अशी भावना महिला कामगारांनी व्यक्त केली आहे.

# 'विद्यार्थी सहभाग परिसंवाद' उत्साहात संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ च्या वतीने 'विद्यार्थी सहभाग परिसंवाद'चे आयोजन केले जाते. या कार्यक्रमातून व्यवस्थापन शाखा शास्त्रातील विद्यार्थ्यांमध्ये विश्लेषणात्मक क्षमता वृद्धिंगत होतात तसेच विविध विषयांवर आत्मविश्वासाने गट सादरीकरण करण्यासाठी नवीन व्यासपीठ उपलब्ध होते अशी माहिती एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट च्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी दिली.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थी गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत 'विद्यार्थी सहभाग परिसंवाद' चे आयोजन करण्यात आले होते. यातील विजेत्या विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी डॉ. धारवाडकर बोलत होत्या. यावेळी डॉ. स्वप्निल सोनकांबळे, डॉ. अनिषकुमार कारिया, डॉ. भूषण परदेशी, डॉ. अमरीश पद्मा, डॉ. ऋषिकेश कुमार आदी उपस्थित होते.

या परिसंवादात "विकासाचा मध्यबिंदू काय असावा, माझे परिसर आणि माझे गाव - विकासाचे मॉडेल. महिला / युवती सुरक्षे मधील माझी भूमिका /जबाबदारी, 'विकसित भारत' माझे स्वप्न - माझा आराखडा, माझ्या करिअरची ब्ल्यू प्रिंट, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि मी." या विषयांवर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे:

प्रथम क्रमांक (रु. ३०००/- रोख पारितोषिक) मानसी सातपुते, सार्थक कोल्हापूर, प्राजक्ता अगम, सायली काटे, सुमित पाचरे, लक्ष्मी सरडा;

द्वितीय क्रमांक (रु. २०००/- रोख पारितोषिक) पौर्णिमा दुगाणे, मानसी दवणे, प्रज्ञा तिवारी, कोमल गावडे, प्रणाली गाढवे, दिया बन्सल;

तृतीय क्रमांक (रु. १०००/- रोख पारितोषिक) एकवीरा कांटाळे, भक्ती कोकणे, श्रेया भोसले, श्रावणी आवघड, तनश्री माधवी, कांचन चाहांदे यांनी बक्षीस मिळवले.

या परिसंवादासाठी परीक्षक म्हणून रोहित म्हसकर व श्रेयश पाटील यांनी काम पाहिले.

संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुदरे व डॉ. काजल महेश्वरी आणि विद्यार्थी प्रतिनिधी दिया बन्सल यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांनी विद्यार्थी सहभाग परिसंवादातील विजेत्यांचे अभिनंदन केले.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेशी तडजोड

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरात विद्यार्थ्यांची धोकादायकपणे वाहतूक केली जाते. विद्यार्थ्यांची सुरक्षितता धोक्यात येऊ नये, म्हणून परिवहन विभागाकडून स्कूल बसेससाठी नियमावली केलेली असते; मात्र या नियमांकडे स्कूल बसचालकांकडून सर्रासपणे दुर्लक्ष केले जाते. अशा 300 वाहनांवर गेल्या वर्षभरात प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे. यातून 25 लाख 22 हजार 500 एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राज्य शासनाने नियमावली तयार केली आहे. या नियमावालीनुसार विद्यार्थ्यांची वाहतूक करणे बंधनकारक आहे. शहरामध्ये रिक्षा, व्हॅन व बसला विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी परवाना दिला जातो. दोन्ही वाहने संपूर्ण पिवळ्या रंगात असावेत आणि मध्ये विटकरी रंगाचा पट्टा असणे बंधनकारक आहे. त्याशिवाय आरटीकडून विद्यार्थी वाहतुकीचा परवाना दिला जात नाही. मात्र, विद्यार्थी वाहतूक नियमांचे उल्लघंन करणाऱ्या बस, व्हॅन, रिक्षा चालकांवर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कारवाई केली आहे. परिवहन विभागाच्या वतीने गेल्या वर्षभरात क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक करणे, चालकाकडे बॅच नसणे, कर, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र नसणे, वाहनांच्या आसनक्षमतेमध्ये बदल करणे, वाहतुकीच्या नियामांचे उल्लंघन करणाऱ्या 300 वाहनांवर वर्षभरात प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली आहे.

## जर्मनीतील विठ्ठलधाम मंदिरात संत तुकाराम महाराजांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

### देहू ते जर्मनी असा विठ्ठलनामाचा गजर; वारकरी परंपरेचा संदेश सातासमुद्रापार

**देहूगाव (दै. संध्या) :**

संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तीची जर्मनीतील विठ्ठल धाम येथे उभारण्यात आलेल्या भगवान विठ्ठल मंदिरात प्रतिष्ठापना होणार असून, त्या मूर्तीचे देहू देवस्थान संस्थानच्या वतीने विधिवत पूजन करण्यात आले. देहूतून जर्मनीपर्यंत विठ्ठलनामाचा गजर पोहोचणार असून, संत परंपरेचा संदेश आता सातासमुद्रापारही जाणार आहे.

शुक्रवारी दुपारी तीन वाजता टाळ-मृदंगाच्या गजरात, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम आणि विठ्ठल नामाच्या जयघोषात हा सोहळा पार पडला. या वेळी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता. उपस्थित वारकरी, भाविक आणि



विश्वस्तांच्या डोळ्यांत भक्तीचे अश्रू, तर ओठांवर विठ्ठलनामाचा जयघोष होता. हा सोहळा केवळ संस्थानपुरता मर्यादित नसून, प्रत्येक मराठी मनाचा आणि वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा अभिमानाचा क्षण ठरला. आपल्या लाडक्या तुकोबांची मूर्ती जर्मनीच्या भूमीवर जाणार असल्याने भाविकांमध्ये उत्साह आणि समाधानाची भावना होती. माघ वद्य एकादशी या अत्यंत मंगल दिवशी हा ऐतिहासिक सोहळा संपन्न झाला.

श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष, विश्वस्त तसेच समस्त वारकरी, भाविकांच्या साक्षीने मूर्तीचे विधिवत मंगेश पाटील यांच्या हस्ते, देहू नगरपंचायतीचे मुख्याधिकारी चेतन कोंडे, नगराध्यक्षा पूजा दिवटे, देहू देवस्थान संस्थानचे अध्यक्ष जालिंदरमहाराज मोरे, विश्वस्त दिलीपमहाराज मोरे, वैभवमहाराज मोरे, विक्रमसिंहमहाराज मोरे, उमेशमहाराज मोरे, गणेशमहाराज मोरे, संजय बालवडकर, पी. आर. पाटील, माजी विश्वस्त नितीनमहाराज मोरे व भाविकांच्या उपस्थितीत पूजा व आरती करण्यात आली. संत तुकाराम महाराजांची मूर्ती संजय आंबेकर हे जर्मनीला घेऊन जाणार आहेत. चिखली येथील मूर्तिकार सतीश हिंगे यांनी ही दोन फूट उंचीची आकर्षक मूर्ती काळ्या पाषाणापासून घडवली आहे.

## उर्से मावळमध्ये चुलत भावाकडून तरुणाचा खून; आरोपी फरार

**उर्से मावळ (दै. संध्या) :**

मावळ तालुक्यातील उर्से येथे एका परप्रांतीय तरुणाची त्याच्याच चुलत भावाने खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हे दोन्ही तरुण मूळचे झारखंड राज्यातील असून, हत्येनंतर आरोपी फरार झाला असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. उर्से, सोमाटणे परिसरात अलीकडे अशा प्रकारच्या घटनांची मालिका सुरूच आहे. लोकेश जगदीश निषाद असे खून झालेल्याचे नाव आहे. तर, आरोपी डिकेश ओलकर निषाद हा फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोघा भावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून अंतर्गत वाद सुरू होता. या वादाचे पर्यवसान आज टोकाच्या संघर्षात झाले आणि रागाच्या भरात चुलत




भावानेच तरुणाचा जीव घेतला. दोघेही तरुण 11 फेब्रुवारी रोजी पुण्यातून उर्से येथे एका इमारतीत भाड्याने राहण्यासाठी आले होते. ते एकाच इमारतीत वेगवेगळ्या मजल्यांवर राहत होते. 12 फेब्रुवारी रोजी कामावरून परतल्यानंतर दोघांमध्ये वाद झाल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर उर्से गावातील विठ्ठल मंदिराजवळ तरुणाचा मृतदेह आढळून आला. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेनंतर आरोपी फरार आहे. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून, तपास सुरू आहे. ठोस माहिती हाती आल्यानंतर गुन्हा नोंदविण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. दरम्यान, गेल्याच आठवड्यात सोमाटणे टोलनाक्याजवळील मैदानावर खेळाच्या वादातून एका परप्रांतीय तरुणाचा निर्घृण खून झाल्याची घटना घडली होती. त्या पार्श्वभूमीवर उर्सेतील या ताज्या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी गस्त वाढवून गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तसेच, उर्से येथील वाढते औद्योगिक क्षेत्र व त्यामुळे वाढणारी परप्रांतीय लोक संख्या यामुळे वाढणारी गुन्हेगारी यावर नियंत्रण ठेवण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. मागील वर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटी एका चिमुरडीवर अत्याचार करून हत्या करण्यात आली होती. या घटनेतील आरोपी परप्रांतीय होता. या घटनेला दीड महिना झाला आहे त्यातच ही आणखी एक घटना समोर आली आहे.

## पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनी मार्च २०२६ मध्ये गुंडाळणार

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट लिमिटेड कंपनी पुढील महिन्यात गुंडाळण्याची कार्यवाही पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरू केली आहे. त्या स्मार्ट सिटी कंपनीवर महापौर रवी लांडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांची संचालक म्हणून शुक्रवार (दि. 13) नियुक्ती करण्यात आली. महापौर लांडगे हे व्हिडिओ कॉम्फरन्सच्या माध्यमातून बैठकीस उपस्थित होते. स्मार्ट सिटी संचालक मंडळाची बैठक पुण्यातील विभागीय कार्यालयात झाली. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, आयुक्त तथा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रावण हर्डीकर, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सहशहर अभियंता मनोज सेठिया, सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत कोल्हे, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे व अधिकारी उपस्थित होते. बैठकीत स्मार्ट सिटीच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात करण्यात आलेल्या विविध कामांची तसेच, प्रकल्पांची माहिती देण्यात आली. किती प्रकल्प पूर्ण झाले. तर, किती प्रकल्प अंतिम टप्प्यात आहेत, याची माहितीही सादर करण्यात आली.

# नव्या पिढीला मराठीशी जोडण्याचे काम व्हावे - योगेश सोमण

### मसाप निवडणूक 'साहित्य संवर्धन आघाडी' जाहीरनामा प्रसिद्ध




**पिंपरी (दै. संध्या) :**

साहित्य चळवळीला व्यापक सामाजिक अधिष्ठान मिळावे, वाचनसंस्कृती बळकट व्हावी आणि नव्या पिढीला मराठीशी जोडण्याचे काम प्रभावीपणे व्हावे, यासाठी 'साहित्य संवर्धन आघाडी' आगामी काळात ठोस आणि कृतीशील कार्यक्रम राबविणार असल्याचे 'साहित्य संवर्धन आघाडी'चे अध्यक्षपदाचे उमेदवार योगेश सोमण यांनी सांगितले.

शुक्रवारी (दि.१३) पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत 'साहित्य संवर्धन आघाडी'चे अध्यक्षपदाचे उमेदवार योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह पदाचे उमेदवार डॉ. स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष पदाचे उमेदवार प्रदीप निफाडकर आणि पुणे जिल्हा कार्यवाह पदाचे उमेदवार संदीप भानुदास तापकीर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचा संपूर्ण कारभार घटनात्मक चौकटीत, पारदर्शक पद्धतीने आणि सदस्याभिमुख पद्धतीने चालवला जाईल, असे योगेश सोमण यांनी सांगितले.

प्रमुख कार्यवाह पदाचे उमेदवार डॉ. स्वाती महाळंक यांनी सांगितले की, राज्यभर कार्यरत असलेल्या परिषदेच्या विविध जिल्हा शाखा अधिक सक्षम करण्यासाठी दरवर्षी ठराविक अर्थसाह्य देण्याचे धोरण राबवले जाईल. या निधीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर साहित्यिक उपक्रम, वाचन चळवळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

दरवर्षी एका जिल्ह्यात विभागीय साहित्य संमेलन आयोजित करून स्थानिक लेखकांना दर्जेदार लेखनासाठी प्रेरणा देणे आणि त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा महत्त्वाचा मुद्दा आहे. तसेच युवा लेखकांना योग्य दिशा मिळावी यासाठी लेखन कार्यशाळा, संवाद सत्रे आणि मार्गदर्शन शिबिरे शाखांच्या माध्यमातून राबवली जाणार आहेत असे डॉ. स्वाती महाळंक यांनी सांगितले.

कोषाध्यक्ष पदाचे उमेदवार प्रदीप निफाडकर यांनी सांगितले की, परिषदेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या मराठी भाषेच्या परीक्षांना राज्य शासनाची मान्यता मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. या परीक्षांना विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा यासाठी शाळा व महाविद्यालयांशी समन्वय साधण्यात येणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वास्तूसाठी अधिक विस्तीर्ण जागा मिळविण्यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल, तसेच परिषदेच्या आर्थिक स्वावलंबनासाठी उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. तसेच परिषदेच्या आजीव सदस्यांना ग्रंथ प्रकाशन व अन्य उपक्रमांसाठी सभागृह अत्यल्प शुल्कात उपलब्ध करून देणे आणि 'साहित्य पत्रिका' पुन्हा एकदा मुद्रित स्वरूपात प्रत्येक आजीव सदस्यापर्यंत पोहोचवण्यात येईल. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर तो सार्थ ठरेल असे कृतीशील कार्यक्रम राबवले जातील, असेही कोषाध्यक्ष पदाचे उमेदवार प्रदीप निफाडकर स्पष्ट करण्यात आले.

पुणे जिल्हा कार्यवाह पदाचे उमेदवार संदीप भानुदास तापकीर यांनी सांगितले की, 'पुणे पुस्तक महोत्सवा'ला उदंड प्रतिसाद मिळत आहे. यंदाच्या '१०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या' निमित्ताने कार्यक्षेत्रात १०० पुस्तक महोत्सव आयोजित करण्याचे नियोजन जाहीर करण्यात आले. तसेच 'जिथे मराठी तेथे साहित्य परिषद' या संकल्पनेतून जगभरातील मराठी माणसाला मराठीशी जोडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. साहित्य निर्मिती करताना लहान मुलांना केंद्रस्थानी ठेवणे, परप्रांतीयांमध्ये मराठीविषयी आस्था निर्माण करणे आणि लेखक, वाचक, प्रकाशक, वितरक व विक्रेते या सर्व घटकांसाठी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार केला आहे.

या निवडणुकीत 'साहित्य संवर्धन आघाडी'कडून अध्यक्षपदासाठी योगेश सोमण, प्रमुख कार्यवाहपदासाठी स्वाती महाळंक आणि कोषाध्यक्षपदासाठी प्रदीप निफाडकर हे उमेदवार आहेत. तसेच पुणे जिल्हा कार्यवाह पदासाठी संदीप भानुदास तापकीर हे उमेदवार आहेत. इतर पदासाठी आघाडीचे अन्य सात उमेदवार निवडणूक लढवत असून, या सर्व उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आजीव सदस्यांचा सक्रिय पाठिंबा अपेक्षित असल्याचे आवाहन आघाडीने केले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मतदार सभासदांनी 'साहित्य संवर्धन आघाडी' च्या उमेदवारांना मतदान करावे. तसेच दि. १२ मार्च २०२६ पर्यंत पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यालयात सर्व सभासदांनी आपल्या मतपत्रिका पोस्टद्वारे किंव्हा प्रत्यक्ष उपस्थित राहून जमा कराव्यात. असे आवाहन 'साहित्य संवर्धन आघाडी' च्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### वाल्हेत दावल मालिकांचा उरुस उत्साहात

वाल्हे (दैनिक संध्या) : हिंदू -मुस्लिम ऐक्याचे प्रतीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्हे (ता. पुरंदर ) गावात हजरत दावल मलिक दर्गा शरीफचा एकदिवसीय उरूस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पीर दावल मलिक दर्ग्याचे मानकरी असलेल्या तांबोळी परिवाराकडून दर्गा संदल निमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दातेवाडी फाट्यानजीकच्या दर्गास्थळा पर्यंत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत बारामती येथील बँड पथकाने विविध धार्मिक गाण्यातून समानतेचा संदेश दिला. त्यानंतर मुस्लिम समाजासह इतर धर्मियांकडून दर्गा समाधीची विधिवत पूजा करून त्यावर फुलांची चादर चढविण्यात आली. यावेळी बाहेर गावाहून आलेल्या भाविकांसह ग्रामस्थांनी हजरत दावल मालिकांच्या दर्गा समाधीच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. या धार्मिक कार्यक्रमात खुदबुद्दीन तांबोळी आरिफ तांबोळी मोहसीन शिकलगार जमीर तांबोळी दिलनवाज कुरेशी अमर तांबोळी अरबाज नदाफ रज्जाक तांबोळी चांद शेख इस्माईल तांबोळी समीर आतार जहांगीर तांबोळी रफिक तांबोळी आदींचा सहभाग होता.

### आज जुन्नरमध्ये शिवनेरी मॅरेथॉन

जुन्नर (दैनिक संध्या) : आज रविवार (ता. १५) छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सवानिमित्त सलग चौथ्या वर्षी राष्ट्रीय पातळीवरील शिवनेरी मॅरेथॉनचे आयोजन शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन, मोरडे फूड्स व पोल्ट्री ब्रिडर्स कोऑर्डिनेशन असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत केनियाच्या धावपटूंचा संघ सहभागी होणार असून त्यासोबतच देश विदेशातील तीन हजाराहून अधिक धावपटू सहभागी होणार असल्याची माहिती शिवनेरी ट्रेकर्सचे अध्यक्ष नीलेश खोकराळे यांनी दिली. ही स्पर्धा पाच, दहा व एकवीस किलोमीटर अशा तीन गटात होणार असून या स्पर्धेची सुरुवात रविवारी (ता. १५) पहाटे साडेपाच वाजता किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून होणार आहे. स्पर्धेचा मार्ग कुसूर-तलाखी-वडज-पारुडे-काटेडे असा आहे. सर्व गटांच्या शर्यतींचा आरंभ व शेवट किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी असलेल्या दत्त मंदिरासमोरील मैदानात होणार आहे.

### भैरवनाथ पतसंस्थेच्या चाकण शाखेचा सोमवारी तिसरा वर्धापन दिन



चाकण (दैनिक संध्या) : शिरूर लोकसभेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी स्थापन केलेल्या श्री भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्थेच्या चाकण शाखेचा सोमवारी (दि.१६) तिसरा वर्धापन दिन साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती पतसंस्थेचे उपाध्यक्ष सागरभाऊ काजळे यांनी दिली. प्रत्येकासाठी प्रत्येकासोबत राहणाऱ्या भैरवनाथ पतसंस्थेची आढळराव पाटील यांनी मंचर जवळील लांडेवाडी येथे मुहूर्तमेढ रोवली. या पतसंस्थेचा आज अजान वृक्षासारखा मोठा वृक्ष झाला असून, ग्रामीण भागात या पतसंस्थेचा विस्तार वाढला आहे. चाकण येथील आंबेठाण चौकात भैरवनाथ पतसंस्थेची शाखा आहे. या पतसंस्थेचा सोमवारी तिसरा वर्धापन दिन असून, त्यानिमित्त संस्थेच्या वतीने श्री सत्यनारायण महापूजा आयोजित केली आहे. माजी खासदार शिवाजीराव पाटील हे या पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष, तर सागरभाऊ काजळे हे उपाध्यक्ष आहेत. कल्पना आढळराव पाटील, योगेश बाणखेले, अभिमन्यू लांडगे, रामशेठ गावडे, महेश ढमढेरे, हनुमंत तागड, शोभा आवटे, राम तोडकर, भिकाजी बोकड, अशोक गव्हाणे, अंजली थोरात, रामदास पवळे हे सर्व संचालक पदावर कार्यरत आहेत. रमेश खरमाळे हे संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत. भैरवनाथ पतसंस्थेच्या चाकण शाखेच्या वतीने तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त सोमवारी सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायण महापुजेला सर्व सभासद, ठेवीदार व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश खरमाळे व उपाध्यक्ष सागर भाऊ काजळे यांनी केले आहे.

### जेजुरीत महाशिवरात्र उत्सवानिमित्त शिवलीला ग्रंथ पारायण सोहळा


जेजुरी (दैनिक संध्या) : तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत बल्लाळेश्वर विकास प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी प्रमाणे महाशिवरात्र उत्सवाच्या निमित्ताने शिवलिला ग्रंथ पारायण सोहळ्याचे आयोजन दि 14 ते 16 फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे. जेजुरी येथील ऐतिहासिक बल्लाळेश्वर मंदिरात या पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात हभप सुरेश महाराज गायकवाड,हभप मंगेश महाराज कदम,हभप मनोज महाराज मोरे यांच्या काल्याच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.तसेच हभप शाम वनारसे,पुंडलिक शेरकर,यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. बल्लाळेश्वर विकास प्रतिष्ठानचे पदाधिकारी मोहन भोसले, करण जगताप, तानाजी जगताप, संदीप जगताप नगरसेवक शिवाजी जगताप आदींनी या धार्मिक उत्सवाचे आयोजन केले आहे.

### जुन्नर येथे रुग्ण हक्क परिषद शाखेचे उद्घाटन

जुन्नर (दैनिक संध्या) : जुन्नर येथील सय्यद वाडा येथे रुग्णांच्या न्याय हक्कासाठी , संरक्षणासाठी व सर्वसामान्य नागरिकांना योग्य उपचार मिळावे यासाठी आयएससो मानांकित असलेल्या रुग्ण हक्क परिषदेच्या शाखेचे, आलं.रुग्ण हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या हस्ते या शाखेच उद्घाटन करण्यात आलं.यावेळी जुन्नर तालुक्यातील प्रतिष्ठित व्यक्ती, नवनिर्वाचित नगरसेवक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जुन्नर येथील सय्यद वाडा येथे तालुक्यातील पहिली शाखा सुरू करण्यात आली असून या शाखेचे अध्यक्ष दोस्त मोहम्मद सय्यद तर उपाध्यक्ष म्हणून वफा सय्यद आणि कार्याध्यक्ष म्हणून बाबा हसन सय्यद काम पाहणार आहेत. तालुक्यातील रुग्णांना एखादा मोठा आजार झाला की त्याला पुण्यासारख्या शहरातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात येते अश्या वेळी या रुग्णाला योग्य मार्गदर्शन करणे, आणि त्यांना योग्य उपचार मिळवून देणे हा या संस्थेच मुख्य उद्देश असणार आहे. रुग्ण हक्क परिषद डॉक्टरांचे संरक्षण आणि रुग्णांच्या न्याय हक्कासाठी लढणारी भारतातील पहिली आयएसओ मानांकित संघटना असून दि. ०८ एप्रिल २०१४ रोजी या रुग्ण हक्क परिषदेची स्थापना संस्थापक अध्यक्ष उमेश चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. रुग्णांना मोफत उपचारांचा हक्क तथा अधिकार मिळालाच पाहिजे, यासाठी जनमानसातील लोकप्रिय चळवळीतील संघटना म्हणून रुग्ण हक्क परिषद काम करीत असून, या रुग्ण हक्क परिषदेने ' कॅन्सर मुक्त महाराष्ट्र अभियान' २०२५- २०२९ ही पाच वर्ष कॅन्सर रुग्णांना मोफत उपचार मिळावेत, यासाठी समर्पित केलेली आहेत.

# चाकण नगरपरिषदेला कापडी पिशव्या देणाऱ्या यंत्राचे लोकार्पण

**मनीषाताई गोरे व नितीनभाऊ गोरे यांचा पुढाकार**





> “प्लास्टिकमुक्त पर्यावरणाच्या दिशेने टाकलेले हे पाऊल अत्यंत स्तुत्य व प्रशंसनीय असून, इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी आणि स्फूर्तीदायक ठरेल.”
> **- मनीषाताई गोरे, नगराध्यक्षा, चाकण.**

**चाकण (दै. संध्या)**

पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी व्हावा आणि नागरिकांना पर्यावरणपूरक पर्याय सहज उपलब्ध व्हावा, या उद्देशाने चाकण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मनिषाताई गोरे व गटनेते नितीनभाऊ गोरे यांच्या पुढाकारातून कापडी पिशव्या देणाऱ्या यंत्राचे लोकार्पण करण्यात आले.

सार्वजनिक ठिकाणी कापडी पिशव्या देणाऱ्या मशिन बसविण्याची संकल्पना महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य, नगरसेवक व गटनेते नितीनभाऊ गोरे यांनी मांडली होती. या संकल्पनेनुसार राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांना अशी यंत्रे महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या माध्यमातून देण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत चाकण नगरपरिषदेला कापडी पिशव्या देणाऱ्या यंत्राचे लोकार्पण करण्यात आले. चाकण नगरपरिषदेच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा मनिषाताई सुरेशभाऊ गोरे व महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीनभाऊ गोरे यांच्या हस्ते या यंत्राचा शुभारंभ करण्यात आला. चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव यांनी या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले.

याप्रसंगी उपनगराध्यक्षा सुवर्णाताई राक्षे, नगरसेविका रूपालीताई कांडगे, जयश्रीताई नायकवाडी, साधनाताई गोरे, पुनमताई शेवकरी, अ‍ॅड. प्रकाशशेठ गोरे, मंगेशदादा कांडगे, अनिताताई घोगरे, साहेबरावजी कड, रणजीतजी जरे, आरतीताई परदेशी, हर्षदभाऊ लेंडघर, स्वातीताई लेंडघर, आकाशभाऊ जाधव, तृप्तीताई जगनाडे, प्रकाशशेठ भुजबळ, विजयाताई तोडकर, विकासनाना धाडगे, धीरजशेठ मुटके, रेश्माताई मुटके, प्रेमभाऊ जगताप, सागरशेठ बनकर, महेशदादा शेवकरी, अनिलजी लोहकरे, अ‍ॅड. वर्षाताई शेवकरी, विकासभाऊ गोरे, विजयाताई जाधव आदी उपस्थित होते.

पर्यावरण पूरक असलेले हे यंत्र चाकण नगरपरिषद हद्दीत अत्यंत वर्दळीच्या व सार्वजनिक ठिकाणी बसविण्यात आले आहे. त्यामुळे खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांना कापडी पिशव्या सहज उपलब्ध होत आहे. प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळण्यास यामुळे मोठी मदत होत असून, या अभिनव उपक्रमाला चाकणकर नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे चाकण नगरपरिषद प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## इंद्रायणी स्वच्छतेसाठी लोकप्रतिनिधीसह प्रशासन, वारकरी व ग्रामस्थ एकवटले

**आळंदी (दै. संध्या)**

इंद्रायणी नदी स्वच्छतेसाठी आळंदी नगरपरिषद व आळंदी देवस्थान व ग्रामस्थ यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या विशेष स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. लोकप्रतिनिधी, प्रशासन, वारकरी, ग्रामस्थ आणि विविध सामाजिक संघटनांनी मोठ्या संख्येने सहभागी होत स्वच्छतेचा संदेश दिला. यावेळी आ.बाबाजी काळे, नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, गटनेते सचिन गिलबिले, विरोधी पक्षनेते आदित्य घुंडरे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ.भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, अ‍ॅड.रोहीणी पवार, पुरुषोत्तम महाराज पाटील, तसेच आजी-माजी पदाधिकारी आणि वारकरी साधक, शालेय विद्यार्थी, सामाजिक संघटना व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी आठ वाजता मोहिमेला प्रारंभ झाला. नदी पात्रातील राडारोडा काढणे, कचरा संकलन, घाट परिसर स्वच्छ करणे अशी कामे हाती घेण्यात आली. मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी स्वतः नदी पात्रात उतरून स्वच्छता करत प्रशासनाच्या कटिबद्धतेचे दर्शन घडविले. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे सपत्नीक मोहिमेत सहभागी झाले, तर आमदार बाबाजी काळे यांनीही प्रत्यक्ष सहभाग नोंदविला.

## किसान जागृती यात्रेचे रांजणगाव गणपती येथे १६ फेब्रुवारी रोजी आगमन

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

> या यात्रेला शेतकरी संघटना, माहिती अधिकार संघटना, ग्राहक संघटना, स्वराज जनजागृती परिषद, ग्रामस्वराज प्रतिष्ठान, रांजणगाव गणपती ग्रामपंचायत, वारकरी संप्रदाय आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी आणि भविष्यासाठी सुरू असलेल्या या लढ्यात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन माहिती सेवा समितीचे अध्यक्ष चंद्रकांत वारघडे यांनी केले आहे.

देशातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संयुक्त किसान मोर्चा (गैर-राजकीय) यांच्या वतीने काढण्यात आलेली ‘किसान जागृती यात्रा’ १६ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे जिल्ह्यातील रांजणगाव गणपती येथे दाखल होणार आहे. कन्याकुमारी ते काश्मीर असा प्रवास करणारी ही यात्रा ७ फेब्रुवारी ते १९ मार्च या कालावधीत देशभरातील विविध राज्यांमधून मार्गक्रमण करत आहे.

एमएसपीला कायदेशीर हमी, संपूर्ण कर्जमाफी, उसाचा एफआरपी दर ६०० रुपये करणे, जमीन संपादन कायदा २०१३ पुन्हा लागू करणे, तसेच पीक विमा योजनेत सुधारणा आदी प्रमुख मागण्यांसाठी ही यात्रा आयोजित करण्यात आली आहे. पंजाबचे ज्येष्ठ शेतकरी नेते आणि संयुक्त किसान मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक जगजीत सिंग डल्लेवाल यांच्या नेतृत्वाखाली ही यात्रा सुरू आहे. रांजणगाव गणपती येथे आगमनानंतर विविध प्रादेशिक शेतकरी संघटना, ग्राहक संघटना, माहिती अधिकार संघटना, भ्रष्टाचारविरोधी संघटना तसेच सामाजिक संघटनांच्या वतीने यात्रेचे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर मोरया लॉन्स, मंगल कार्यालय येथे सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले असून या सभेत जगजीत सिंग डल्लेवाल शेतकरी व युवकांना मार्गदर्शन करणार आहेत.

डल्लेवाल यांनी यापूर्वी शेतकरीविरोधी तीन कायद्यांविरोधात दिल्ली सीमेवर सलग १३ महिने चाललेल्या आंदोलनाचे नेतृत्व केले होते. तसेच २०१८ साली रामलीला मैदानावर अण्णा हजारे यांच्यासोबत शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उपोषण केले होते. यानंतरही त्यांनी विविध मागण्यांसाठी राज्य व केंद्र सरकारकडे सलग १३१ दिवस उपोषण केले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळापासून शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी देशभरात अनेक संघटना लढा देत आहेत. मात्र आजही शेतकऱ्यांना कष्टाचा योग्य मोबदला मिळत नसल्याने कर्जाचे ओझे वाढत आहे आणि अनेकांना आत्महत्येसारखा टोकाचा निर्णय घ्यावा लागत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावेत, या मागणीसाठी ‘किसान जागृती यात्रा’ महाराष्ट्रात प्रवेश करत आहे.

## सह्याद्री व्हॅली महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर उत्साहात सुरु




**आळेफाटा (दै. संध्या)**

राष्ट्रीय सेवा योजना ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होण्यासाठी महत्त्वपूर्ण असे शिबिर आहे यामधून श्रम संस्कार केले जातात या उपक्रमाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करणे, सामाजिक कार्याचा सराव व्हावा यासाठी हा शासनाचा महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. आजचा नवयुवक अशा शिबिरातून घडतो त्यामुळे युवकांनी मोठ्या प्रमाणामध्ये शिबिरामध्ये सहभाग नोंदवला पाहिजे असे आव्हान राष्ट्रीय सेवा योजनेचे मा. जिल्हा समन्वयक प्राध्यापक डॉ. श्रीकांत फुलसुंदर यांनी केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर "शाश्वत विकासासाठी युवक: पाणलोट आणि पडीक जमिनी व्यवस्थापन" या शीर्षकाखाली श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्ट(संस्था), आळे येथे उत्साहात सुरू झाले. या शिबिराचे उद्घाटन श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्टचे सचिव आणि मा. पंचायत समिती सदस्य जीवन शेठ शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी सह्याद्री व्हॅली कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी चे खजिनदार सचिन चव्हाण सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. बालारामडू, प्रसिद्ध उद्योजक पप्पू शेठ डोंगरे, पवन डोके आणि झेड. पी. स्कूल कोळवाडीचे मुख्याध्यापक उदय पुरी, प्रा. किरण फटांगरे, प्रा.श्रद्धा दाते, प्रा. तेजश्री मते, प्रा. विनया वाघोले या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. या शिबिरामध्ये एकूण 50 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये गाव पातळीवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यामध्ये ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य शिबिर, पथनाट्य सादरीकरण तसेच विविध विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी उद्धव भारती यांनी दिली. हे शिबिर पुढील सात दिवस सुरू राहणार आहे असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य पी. बालारामडू यांनी केले तर आभार एन.एस.एस.चे कार्यक्रम अधिकारी उद्धव भारती यांनी मानले.

## दुचाकी चोराकडून चार मोटार सायकली जप्त

**चाकण (दै. संध्या)**



चाकण हद्दीत वाढत्या दुचाकी चोरीच्या पार्श्वभूमीवर चाकण दक्षिण पोलीस ठाण्याच्या तपास पथकाने धडक कारवाई करत एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. त्याच्याकडून तीन गुन्हे उघडकीस आणत चार मोटारसायकली जप्त केल्या आहेत. शुभम मधुकर खामकर असे अटक करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. येथील पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांवर आळा घालण्यासाठी चाकण भागातील पोलीस प्रशासन प्रभावी उपाययोजना राबवित आहेत. पोलीस पथकाने चाकण पंचक्रोशीतील सुमारे ६० ते ६५ सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने निरीक्षण केले. तसेच गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीनुसार खामकर यास ताब्यात घेण्यात आले. अधिक चौकशी केली असता त्याने चाकण, दिघी व हिंजवडी परिसरातून दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल पाटील, शिवाजी चव्हाण, प्रकाश नवले, मंगेश फापाळे, सुनील भागवत, रेवन्नाथ खेडकर, अमोल माटे, गजानन चव्हाण, आदम शेख आदींनी ही कारवाई केली. चाकण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

## नवनिर्वाचित जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा भाजपतर्फे सत्कार



**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण निवडणुकीत विजयी झालेल्या भारतीय जनता पार्टी, पुणे जिल्हा (उत्तर) येथील सर्व नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. हा कार्यक्रम भाजपा पुणे जिल्हा (उत्तर) अध्यक्ष प्रदीप कंद यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास भाजपा महाराष्ट्र प्रदेश क्रीडा आघाडी अध्यक्ष संदीप भोंडवे, जिल्हा सरचिटणीस श्रीकृष्ण देशमुख, माजी जिल्हा परिषद सदस्य शेखर पाचुंदकर, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक नवनाथ काकडे, प्रकाश सावंत, अशोक गायकवाड, योगेश काकडे, शंकर बेडेकर, कमलेश काळभोर, सुरज चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी लोणीकंद–पेरणे जिल्हा परिषद गटातून किरण संपत साकोरे, रांजणगाव–कारेगाव गटातून स्वाती पाचुंदकर, तळेगाव ढमढेरे गटातून दीपालीताई गव्हाणे आणि कवठे यमाई–टाकळी हाजी गटातून राजेंद्र गावडे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पंचायत समिती सदस्यांमध्ये लोणीकंद गणातून मोनिका कंद, पेरणे गणातून राणी वाळके, केसनंद गणातून कुशाल सातव, सोरतापवाडी गणातून सुदर्शन चौधरी, सावरगाव गणातून संजय वऱ्हाडी, रांजणगाव गणातून सागर देवकर, कारेगाव गणातून मनिषा पाचंगे, कवठे यमाई गणातून कांचन सांडभोर, टाकळी हाजी गणातून सुनीताताई कड आणि तळेगाव ढमढेरे गणातून विद्या भुजबळ यांचेही अभिनंदन करण्यात आले.

# पीएमपीएमएल बस पेटली



**प्रसंगावधानाने ५० प्रवाशांचे प्राण वाचले**

**चाकण (दै. संध्या)**

निगडीवरून महाळुंगे एमआयडीसीकडे जाणारी पीएमपीएलची बस चाकण औद्योगिक वसाहतीतील महेंद्रा कंपनीसमोर अचानक पेटल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी (दि.१३) सकाळी अकरा वाजण्याच्या दरम्यान घडली. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केल्याने बस पूर्णपणे जळून खाक झाली. ही बस चाकण एमआयडीसी भागातील कामगारांसाठी विशेष फेरी म्हणून सुरू करण्यात आली होती. घटनेच्या वेळी बसमध्ये सुमारे ५० प्रवासी होते. बसमधून धूर निघू लागल्याचे लक्षात येताच चालक व वाहक यांनी प्रसंगावधान राखत तातडीने बस थांबवली. आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर उतरवले. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, बसच्या पुढील भागातून अचानक धूर निघू लागला आणि काही क्षणांतच ज्वाळांनी बसला वेढले. बस इलेक्ट्रिक असल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून, शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र आगीचे नेमके कारण अधिकृत तपासानंतरच स्पष्ट होणार आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी तत्काळ आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत बस पूर्णपणे जळून खाक झाली होती. आगीमुळे काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, औद्योगिक वसाहतीत कामगारांची मोठ्या प्रमाणावर ये - जा सुरू असते. त्यामुळे या घटनेमुळे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. संबंधित यंत्रणेकडून घटनेचा तपास सुरू असून, प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने पीएमपीएल च्या बसची तांत्रिक तपासणी करण्याची मागणी होत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली, तरी बस जळून खाक झाल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया साठी एबी डिव्हिलियर्स ब्रँड ॲम्बेसेडर

मुंबई (दैनिक संध्या) : भारतातील एअर कार्गो आणि लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी 2026 मध्ये अधिक व्यापक आणि विविधतापूर्ण व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. एअर कार्गो इंडिया 2026 ने आपल्या मागील आवृत्तीच्या तुलनेत 43 टक्क्यांनी प्रदर्शनी क्षेत्र वाढवले असून, त्याचबरोबर ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया या नव्या प्रदर्शनाची पहिली आवृत्ती आयोजित करण्यात येत आहे. हा संयुक्त कार्यक्रम 25 ते 27 फेब्रुवारी 2026 दरम्यान मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे होणार असून आयोजन Messe Muenchen India यांच्याकडून केले जात आहे. माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू एबी डिव्हिलियर्स यांची ट्रान्सपोर्ट लॉजिस्टिक इंडिया 2026 साठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जागतिक क्रिकेट कारकिर्द, नेतृत्वगुण आणि उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखले जाणारे डिव्हिलियर्स हे उत्कृष्टता, लवचिकता आणि प्रभावी अंमलबजावणीचे प्रतीक आहेत—जे भारताच्या विकसित होत असलेल्या मल्टीमोडल लॉजिस्टिक्स परिसंस्थेच्या महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित करतात. या दोन्ही ट्रेड फेअर्समध्ये एकत्रितपणे 300 हून अधिक भारतीय आणि आंतरराष्ट्रीय प्रदर्शक सहभागी होण्याची अपेक्षा आहे. विमान वाहतूक, लॉजिस्टिक्स, उत्पादन आणि कार्गो पायाभूत सुविधा क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा सहभाग असणार आहे, ज्यामध्ये एअर इंडिया, इंडिगो, मर्स्क, डीएचएल लॉजिस्टिक्स, एमिरेट्स स्कायकार्गो, सीईव्हीए लॉजिस्टिक्स, कतार एअरवेज कार्गो, एतिहाद कार्गो, रियाध एअर, बॉश, बोईंग, कॅथे कार्गो, चांगी एअरपोर्ट, सीजे डार्कल, ॲमेझॉन एअर कार्गो, केटीझेड एअर कार्गो, स्मार्टकार्गो आणि गुडरिच मॅरिटाइम यांचा समावेश आहे.

### प्रदेश काँग्रेसच्या 'विमुक्त जाती व भटक्या जमाती विभाग प्रमुखपदी ॲड. पल्लवी रेणके

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत असलेल्या 'विमुक्त जाती व भटक्या जमाती सेल'चे रूपांतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत 'विमुक्त जाती व भटक्या जमाती विभाग' असे करण्यात आले असून काँग्रेस प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून ॲड. पल्लवी रेणके यांची विभाग प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्रामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातींची लोकसंख्या राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या किमान ११% आहे. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या हेतूने समाजातील या अतिदुर्लक्षित व वंचित समाज घटकाला न्याय मिळण्यासाठी काँग्रेस पक्षाने राज्याच्या निर्मितीपासूनच या समाजाला शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देऊ केले आहे. परंतु कडकलक्ष्मी, वैदू, गोंधळी, जोशी, वासुदेव, बहुरूपी, भराडी, डोंबारी, टकारी, रामोशी, लमाण या व अश्या सुमारे ४० जमाती आजही त्यांच्या पारंपरिक भटकंती व व्यवसायामुळे संघटित झालेल्या नाहीत. तसेच विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकलेल्या नाहीत. अशा विखुरलेल्या व वंचित समुदायास संघटित करण्याचा निश्चय महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने घेतला आहे. या कामाचे महत्त्व जाणून काँग्रेस प्रांताध्यक्ष  हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी अंतर्गत असलेल्या 'विमुक्त जाती व भटक्या जमाती विभागाला बळकटी देण्याचे ठरविले आहे.

### लाचखोरीप्रकरणी मंत्र्याचे कार्यालय सिल केल्याची घटना अत्यंत गंभीर

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री, नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्याला मंत्रालयात लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आल्याने लाचलुचपत विभागाने मंत्री कार्यालयच सिल केले आहे. या घटनेने भाजपा महायुती सरकारच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. या लाचखोरीची निष्पक्ष चौकशी होण्यासाठी मंत्री नरहरी झिरवळांनी तात्काळ मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. मंत्रालयातील लाचखोरीवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, काँग्रेस सरकारच्या काळात लोकाभिमुख कारभार करण्यासाठी लोकांना सरकार आपले वाटावे यासाठी राज्य सरकारचे मुख्यालय असणा-या सचिवालयाचे नाव बदलून मंत्रालय करण्यात आले. पण महाभ्रष्ट भाजपा महायुतीने मंत्रालयाचे भ्रष्टाचारालय केले आहे. झिरवळ यांच्या कार्यालयातील लिपिकाने वरिष्ठांच्या सांगण्यावरून लाच घेतल्याचे लाचलुचपत विभागाच्या अधिका-यांना सांगितल्याची माहिती समोर येत आहे, हे आणखी धक्कादायक आणि गंभीर आहे. त्यामुळे मंत्री नरहरी झिरवळ यांच्यासह त्यांच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. “संबंध आढळल्यास राजीनामा देईन” अशी भूमिका मंत्री नरहरी झिरवळ यांनी मांडली आहे मात्र नैतिक जबाबदारीच्या दृष्टीने, आपल्या कार्यालयात खुलेआम लाचखोरी सुरु असल्याचे समोर आल्यावर निष्पक्ष चौकशीसाठी त्यांनी तात्काळ मंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहिजे असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### अजय देवगण यांच्या दमदार आवाजात ‘शतक’चा ट्रेलर प्रदर्शित




मुंबई (दैनिक संध्या) : ‘शतक: संघ के १०० वर्ष’ या चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. या ट्रेलरला बॉलिवूड सुपरस्टार अजय  देवगण यांच्या प्रभावी आवाजामुळे चित्रपट पाहण्याची उत्सुकता वाढली आहे. त्यांच्या आवाजामुळे ट्रेलरमध्ये गंभीरता आणि भावनिकता वाढली असून प्रेक्षकांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत होते. ट्रेलरमध्ये त्याग, संघर्ष आणि राष्ट्रप्रथम या भावनेने प्रेरित १०० वर्षांचा प्रवास दाखवण्यात आला आहे. शिस्त, सेवा आणि समर्पण यांच्या बळावर समाज आणि देशासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्यांना हा चित्रपट श्रद्धांजली अर्पण करीत आहे. हा चित्रपट अशा एका विचारसरणीची कथा सांगतो, जिचा काळानुसार अंत होईल असे कधी वाटले होते. मात्र प्रत्येक पिढीसोबत ती अधिक मजबूत होत गेली. गुरुजी एम. एस. गोलवलकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेत, संघ ‘काळासारखा अखंड’ असल्याचे चित्रपटात मांडले आहे. लोकांना जोडणे हे या प्रवासाचे मुख्य वैशिष्ट्य राहिले आहे. हा चित्रपट केवळ इतिहास सांगत नाही, तर अनेक वर्षांपासून प्रचलित असलेल्या समजुती आणि गैरसमजांवरही आपली भूमिका मांडतो. चित्रपटाबद्दल अजय देवगण म्हणाले की, "राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. एक शतक हे केवळ कालगणनेतील टप्पा नसून, ते पिढ्यान् पिढ्यांच्या बांधिलकी, त्याग आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे प्रतीक आहे. या शंभर वर्षांत संघाने सेवा, एकात्मता आणि सांस्कृतिक ओळख यांविषयीच्या चर्चांना आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

# आयुषी खुराणा–सूरज कक्कर : प्रेमकथेचा प्रवास

मुंबई (दै. संध्या)

झी टीव्हीवरील ‘जाने अनजाने हम मिले’ या मालिकेत भरत अहलावत (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या भूमिका असून प्रेम आणि नातेसंबंध यांचे संवेदनशील चित्रण केल्याबद्दल प्रेक्षकांनी या मालिकेचे कौतुक केले आहे. राघव हा भूतकाळातील वेदनामुळे रागीट आणि भावनिक संघर्ष करणारा व्यक्ती आहे, तर रीत धीर, समजूतदारपणा आणि प्रेमाची खरी खोली दर्शवणारी आहे. व्हॅलेंटाईन्स आठवड्यातील एकत्रिततेच्या भावना लक्षात घेऊन, आयुषी खुराणा सांगत आहे की कशाप्रकारे रीतची भूमिका करताना तिला प्रेमाचा नवा अर्थ समजला आणि आपले पती सूरज कक्कर यांच्यासोबतच्या वैवाहिक नात्यावरही त्याचा प्रभाव पडला.

आयुषी खुराणा सांगते की रीतची भूमिका केल्यामुळे तिला प्रेमाचा खोल अर्थ समजण्यास मदत झाली. ती म्हणाली, “जाने अनजाने हम मिले’ ऑन-एअर झाल्यानंतर केवळ एकाच महिन्यात माझे आणि सूरजचे लग्न झाले. हे खरंच अविश्वसनीय होते. रीत जे ऑन-स्क्रीन अनुभवत होती, तसंच काहीसं मीही माझ्या आयुष्यात अनुभवत होते. रीतची भूमिका करताना मला समजलं की प्रेम म्हणजे मोठमोठ्या गोष्टी नाहीत; तर संयम, समजूत, तडजोड आणि दररोज आपल्या जोडीदाराची निवड करणे—हीच खरी प्रेमाची व्याख्या आहे.”

ती पुढे म्हणाली, “रीत नेहमीच आपल्या कुटुंबाला प्राधान्य देते आणि हे माझ्या मनात कायमचं घर करून गेलं. त्यामुळे मी माझ्या नात्यांबद्दल आणखी संवेदनशील झाले आणि प्रेम व विवाहावरचा माझा विश्वास आणखी दृढ झाला.”

सध्या ’जाने अनजाने हम मिले’ मालिकेत अनेक प्रयत्न करूनही रीत उन्नतीचे लग्न थांबवू शकत नाहीये कारण ती विक्रांतचे खरे रूप सर्वांसमोर आणण्यात अपयशी ठरते. आपला भाऊ ध्रुवलाही ती हे समजावू शकत नाहीये की क्रिती त्याच्यासाठी चुकीची जोडीदार आहे. त्याचवेळी रीत आणि राघव लवकरच पालक होणार असतानाच त्यांच्या आयुष्यात नवीन नाट्य वाढत चालले आहे.

‘जाने अनजाने हम मिले’ मध्ये हे सगळे नाट्य पहा, दररोज रात्री 10:30 वाजता फक्त झी टीव्हीवर!




## संत सेवालाल महाराज : सामाजिक पुनर्जागरणाचे प्रेरणास्थान

मुंबई (दै. संध्या)

१५ फेब्रुवारी हा दिवस केवळ एका संतपुरुषाची जयंती म्हणून साजरा होणारा दिवस नाही, तर तो भारतीय समाजाच्या उपेक्षित, वंचित आणि दीर्घकाळ दुर्लक्षित राहिलेल्या घटकांच्या सामाजिक आत्मभानाचा उत्सव आहे. या दिवशी संत सेवालाल महाराज यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि मध्य भारतात लाखो अनुयायी श्रद्धेने नतमस्तक होतात. मात्र संत सेवालाल महाराजांचे स्मरण केवळ भक्तीपुरते मर्यादित न राहता त्यांच्या सामाजिक कार्याच्या व्यापक अर्थाने झाले, तरच ही जयंती खऱ्या अर्थाने साजरी झाली असे म्हणता येईल.

भारतीय समाजरचनेत बंजारा समाज हा ऐतिहासिकदृष्ट्या भटक्या जीवनपद्धतीशी निगडित राहिला आहे. व्यापार, धान्यवाहतूक, गुरांचे कळप, जंगलांशी जोडलेले जीवन आणि सतत स्थलांतर या सगळ्या कारणांमुळे हा समाज मुख्य प्रवाहापासून दूर राहिला. स्थिर निवास नसल्यामुळे शिक्षण, आरोग्य, प्रशासन आणि राजकीय सहभाग यांपासून तो वंचित राहिला. अशा परिस्थितीत सामाजिक आत्मसन्मान हरवलेला, आत्मविश्वास खचलेला आणि अनेकदा स्वतःच्या अस्मितेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झालेला समाज संत



सेवालाल महाराजांना लाभला. संत सेवालाल महाराजांचे महत्त्व याच ठिकाणी ठळकपणे समोर येते. त्यांनी समाजाला प्रथम बाह्य शत्रूंचा नव्हे, तर अंतर्गत दुर्बलतेचा शोध घ्यायला शिकवले. समाजाची दारिद्र्य, उपेक्षा आणि अवहेलना ही केवळ इतरांनी लादलेली स्थिती नाही, तर काही प्रमाणात आत्मविस्मृती आणि विस्कळीतपणातूनही ती निर्माण झाली आहे, हा विचार त्यांनी ठामपणे मांडला. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचा पाया आत्मशुद्धी आणि आत्मसन्मान यांवर आधारित होता. संत सेवालाल महाराजांच्या विचारविश्वात व्यसनमुक्तीला अत्यंत मध्यवर्ती स्थान होते. त्या काळात मद्यपान, जुगार आणि अनियंत्रित खर्च यांमुळे अनेक बंजारा कुटुंबे आर्थिक व नैतिक अधःपतनाकडे झुकत होती. त्यांनी व्यसनाला वैयक्तिक दोष मानले नाही, तर सामाजिक आजार म्हणून पाहिले. “व्यसन केवळ शरीर नष्ट करत नाही, ते विवेक, कुटुंब आणि समाज यांनाही पोखरते,” हा त्यांचा ठाम संदेश होता. त्यामुळे त्यांनी कीर्तन, संवाद आणि प्रत्यक्ष उदाहरणांद्वारे समाजाला संयमाचा मार्ग दाखवला.

त्यांच्या सामाजिक कार्यात श्रमसंस्कृतीचा पुरस्कार हा आणखी एक मूलभूत पैलू होता. श्रम हे लाजिरवाणे नाहीत, तर तेच माणसाचे खरे भूषण आहेत, असा विचार त्यांनी रुजवला. परिश्रमातून मिळवलेले अन्नच पवित्र असते आणि तेच आत्मसन्मान टिकवते, हे त्यांनी समाजाच्या मनात कोरले. भटक्या समाजाला ‘आळशी’ किंवा ‘अविश्वसनीय’ अशी लेबले लावली जात असताना, संत सेवालाल महाराजांनी श्रमशीलतेचा गौरव करून समाजाच्या प्रतिमेला नैतिक अधिष्ठान दिले. स्त्रीसन्मान हा त्यांच्या सामाजिक विचारांचा अत्यंत प्रगत आणि कालातीत पैलू मानला जातो. ज्या काळात स्त्रीला बहुतेक समाजांत दुय्यम स्थान होते, त्या काळात संत सेवालाल महाराजांनी स्त्रीला कुटुंबाची आधारशिला मानले. त्यांनी पुरुषप्रधान मानसिकतेला थेट आव्हान दिले नाही, पण स्त्रीबद्दलचा आदर, संयम आणि जबाबदारी यांची शिकवण देऊन समाजमन बदलण्याचा प्रयत्न केला. स्त्रीचे शील म्हणजे केवळ तिची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे, हा संदेश त्यांच्या विचारांतून स्पष्टपणे उमटतो.

संत सेवालाल महाराजांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडालाही विरोध केला. धर्माच्या नावाखाली चालणारे अवास्तव विधी, आर्थिक शोषण आणि भीतीवर आधारित श्रद्धा यांना त्यांनी स्पष्ट नकार दिला. त्यांचा धर्म हा अत्यंत साधा, माणुसकीवर आधारित आणि व्यवहार्य होता. “सेवाच खरी पूजा आहे,” हा त्यांचा विचार केवळ आध्यात्मिक नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाचा मंत्र होता. त्यामुळे त्यांच्या शिकवणीत बाह्य आडंबरांपेक्षा अंतःकरणातील शुद्धतेला अधिक महत्त्व होते. निसर्गाशी असलेले नाते संत सेवालाल महाराजांच्या विचारांत विशेषत्वाने दिसते. जंगल, पाणी, पशुधन आणि भूमी या सगळ्यांवर बंजारा समाजाचे जीवन अवलंबून होते. त्यांनी निसर्गाला केवळ संसाधन न मानता सहजीवी घटक म्हणून पाहिले. वृक्षतोड टाळणे, पाण्याचा सन्मान राखणे आणि प्राणिमात्रांवर दया ठेवणे, हे केवळ नैतिक उपदेश नव्हते, तर जीवनरक्षणाचे तत्त्वज्ञान होते. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हे विचार विलक्षण दूरदृष्टीचे वाटतात.

## भूमिका मिळणे म्हणजे आर्शिवाद

मुंबई (दै. संध्या)

महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर अभिनेता जयशंकर त्रिपाठी यांनी एन्ड टीव्हीवरील आगामी मालिका हे भगवान... कितना बदल गया इंसान! मधील भूमिका मिळाल्याबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. ही भूमिका मिळणे म्हणजे यंदाच्या महाशिवरात्रीला महादेवांचा आशीर्वाद लाभल्यासारखे असल्याचे त्यांनी सांगितले.

महाशिवरात्री उत्सव जवळ येत असताना जयशंकर त्रिपाठी अत्यंत उत्साही आहेत. ते स्वतःला निस्सीम शिवभक्त मानतात आणि त्यांच्या मते या मालिकेत काम करण्याची संधी ही महादेवांनी योग्य वेळी दिलेली आहे. मालिकेत ते ‘महेश शर्मा’ ही भूमिका साकारत असून भगवान महादेव आणि अभिनेता तरुण खन्ना यांच्यासोबत असलेले आध्यात्मिक नाते त्यांच्या वैयक्तिक आणि कलात्मक प्रवासाला प्रेरणा देणारे ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

या पवित्र सणाबाबत भावना व्यक्त करताना जयशंकर त्रिपाठी म्हणाले, “लहानपणापासून महाशिवरात्री माझ्या आयुष्यातील महत्त्वाचा सण आहे. मी दरवर्षी उपवास, प्रार्थना आणि रात्रभर भजन करून महादेवांची भक्ती करतो. यंदाचा उत्सव माझ्यासाठी अधिक खास आहे, कारण ‘हे भगवान... कितना बदल गया इंसान!’ या



मालिकेत मला महत्त्वाची भूमिका साकारण्याची संधी मिळाली आहे. माझ्या श्रद्धेला साजेशी ही मालिका आहे आणि त्याचा भाग होणे म्हणजे महादेवांचा आशीर्वाद मिळाल्यासारखे वाटते. या प्रोजेक्टमध्येही ते मला मार्गदर्शन करतील, असा माझा विश्वास आहे.”

उत्सवाच्या परंपरांबाबत सांगताना ते पुढे म्हणाले, “महाशिवरात्रीच्या दिवशी मी ‘ॐ नमः शिवाय’ मंत्राने दिवसाची सुरुवात करतो. कुटुंबासोबत मंदिरात जाऊन शिवलिंगावर जल व दूधाभिषेक करतो, बेलपत्र, धतुरा आणि फुले अर्पण करतो. आम्ही रात्रभर जागरण करून भजन ऐकतो आणि भगवान शिवांच्या तत्वांचा विचार करतो. ही परंपरा मला मानसिक समाधान देते आणि जीवनात श्रद्धा व ताकद कायम ठेवण्याची प्रेरणा देते.”

प्रेक्षकांना जयशंकर त्रिपाठी ‘महेश शर्मा’ या भूमिकेत एन्ड टीव्हीवरील हे भगवान... कितना बदल गया इंसान! मालिकेत पाहायला मिळणार आहेत. तसेच या मालिकेचे सर्व भाग हिंदी ZEE5 वरही कधीही पाहता येणार आहेत.

## POVA Curve 2 अधिकृतपणे लाँच

नवी दिल्ली (दै. संध्या)

POVA ने नेहमीच स्मार्टफोनला ओळखीचा बॅज मानले आहे, विशेषतः धाडसी भारतीय भावनेसाठी डिझाइन केलेले. मूळ POVA Curve ने त्याच्या नाविन्यपूर्ण सौंदर्यशास्त्राने एक नवीन ट्रेंड सेट केला असला तरी, POVA Curve 2 ही एक मोठी प्रगती आहे. अंतराळयान अभियांत्रिकीच्या उत्कृष्ट अचूकतेने प्रेरित होऊन, ते 'थंड' घटकाला अधिक तीक्ष्ण आणि अधिक परिष्कृत बनवते, गर्दीतून वेगळे दिसण्यासाठी तयार केलेले लाँचपॅड-रेडी डिझाइन. भारताच्या सुरुवातीच्या दत्तककर्त्यांच्या अथक परिश्रमासाठी तयार केलेले, POVA Curve 2 मोठ्या




प्रमाणात न करता 'आतील शक्ती' प्रदान करते. ते रॉक-सॉलिड कनेक्टिव्हिटी आणि अंतर्ज्ञानी AI ला सेगमेंट-फर्स्ट इंजिनिअरिंग वैशिष्ट्यासह एकत्रित करते: एक मोठी, उच्च-सहनशक्ती बॅटरी एका अतिशय स्लिम प्रोफाइलमध्ये पॅक केली जाते! न थांबता येणारे कार्यप्रदर्शन आणि एक आकर्षक, हलके फॉर्म फॅक्टर शोधणाऱ्यांसाठी हे अंतिम पॉवरहाऊस आहे जे त्यांना कधीही मंद करत नाही.

## प्रसिद्ध अभिनेत्री गुलकी जोशी ‘यादें’ या मालिकेत दिसणार महत्त्वपूर्ण भूमिकेत

मुंबई (दै. संध्या)

सोनी सब आपल्या आगामी वैद्यकीय नाटक हुई गम्म यादें – एक डॉक्टर, दोन जिंदगीयाँ सादर करण्यास सज्ज आहे. हे जागतिक स्तरावर प्रशंसित इटालियन मालिके डीओसी चे भारतीय रूपांतर असून, अनेक देशांमध्ये यशस्वीपणे सादर झाले आहे. दुसऱ्या संधीच्या संकल्पनेवर आधारित ही कथा तेजस्वी डॉक्टर देव (इकबाल खान) यांच्या असामान्य प्रवासाची आहे, ज्यांना अपघातानंतर आठ वर्षांची स्मृती गमावली आणि त्यानंतर त्यांनी आपले जग पुन्हा उभारले. प्रसिद्ध अभिनेत्री गुलकी जोशी या मालिकेत महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आहेत. त्या डॉक्टर देव मेहता यांच्या माजी पत्नी सृष्टीची भूमिका निभावणार



आहेत. सृष्टी ही एक मजबूत, बुद्धिमान आणि भावनिकदृष्ट्या गुंतागुंतीची स्त्री आहे, जी आपल्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्याचा समतोल शांतपणे राखते. पूर्वी डॉक्टर असलेल्या सृष्टीने आपल्या मुलांना वाढवण्यासाठी वैद्यकीय व्यवसाय सोडला आणि नंतर त्या रुग्णालयातील प्रशासकीय जबाबदाऱ्या स्वीकारल्या जिथे देव काम करत होता. त्यांच्या सहा वर्षांच्या मुलगा ध्रुवच्या दुर्दैवी मृत्यूनंतर देवच्या व्यक्तिमत्त्वात झालेल्या बदलामुळे त्यांचे वैवाहिक जीवन तुटले, असे सृष्टीला वाटते. मात्र, नियती अनपेक्षित वळण घेते जेव्हा देवची स्मृती हरवते. सृष्टीसमोर अचानक देवचा असा रूप येतो, जे तिने अनेक वर्षे पाहिले नव्हते—एक कोमल, समर्पित पुरुष जो पुन्हा तिच्यावर खोलवर प्रेम करतो. भूमिकेबद्दल बोलताना गुलकी जोशी म्हणाल्या “यादेंचा भाग होण्याबद्दल मी खरोखरच खूप उत्सुक आहे. मला जेव्हा कथानक ऐकवले गेले, तेव्हा लगेच जाणवले की ही अशी कथा आहे ज्याचा भाग मला व्हायचे आहे. ही कथा अतिनाट्यमय वाटली नाही, तर खरी वाटली. भावना, नाती—सगळे प्रामाणिक आणि संबंधित वाटले. माझ्यासाठी एखाद्या शोला होकार देणे हे फक्त भूमिकेबद्दल नसते, तर संपूर्ण अनुभवाबद्दल असते—कथा, सहकलाकार, आणि स्क्रिप्ट मला कलाकार आणि व्यक्ती म्हणून स्पर्श करते का हे महत्त्वाचे असते. या प्रकल्पाने मला एकाच वेळी आराम आणि उत्साह दिला आहे. सेटवरील ऊर्जा आधीच सकारात्मक आणि केंद्रित वाटते, आणि ते खूप महत्त्वाचे आहे. जेव्हा प्रत्येकजण आपल्या सांगत असलेल्या कथेत विश्वास ठेवतो, तेव्हा संपूर्ण प्रक्रिया अधिक खास होते.”

हुई गम्म यादें – एक डॉक्टर, दोन जिंदगीयाँ लवकरच सोनी सब वर पाहायला मिळणार.

# नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल आंतरराष्ट्रीय बाल कर्करोग दिनासाठी वचनबद्ध

## 'ग्रो ग्रीन' उपक्रमाच्या शुभारंभासह आंतरराष्ट्रीय बाल कर्करोग दिन साजरा

मुंबई (दै. संध्या)

आंतरराष्ट्रीय बाल कर्करोग दिनानिमित्त, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबईने एक विशेष जागरूकता आणि सहभाग कार्यक्रम आयोजित केला. कर्करोगाशी झुंजणाऱ्या मुलांच्या अदम्य धैर्य आणि दृढनिश्चयाचे साजरे करणे आणि लवकर निदान, वेळेवर उपचार आणि समग्र काळजीचे महत्त्व अधोरेखित करणे हा या उपक्रमाचा उद्देश होता. "पॉवर चॅम्प्स कॅन्सर: फ्रॉम चॅलेंज टू चेंज" या थीम असलेल्या या कार्यक्रमात रोगापेक्षा शक्ती मोठी आहे हा संदेश देण्यात आला आणि तरुण योद्ध्यांच्या प्रेरणादायी प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला. एकता आणि उत्सवाच्या भावनेने भरलेल्या या कार्यक्रमाने रुग्णालयाच्या लॉबीमध्ये एक उबदार आणि समावेशक वातावरण निर्माण केले, जिथे कर्करोगाशी झुंजणारी मुले, त्यांचे कुटुंब, डॉक्टर, काळजीवाहक, देणगीदार आणि भागीदार संस्था आशा आणि एकतेने एकत्र आल्या.

या कार्यक्रमाबद्दल बोलताना, बालरोग ऑन्कोलॉजी, हेमेटो-ऑन्कोलॉजी आणि बीएमटीच्या वरिष्ठ सल्लागार आणि विभाग प्रमुख डॉ. पूर्णा कुरकुरे म्हणाल्या, “लवकर निदान आणि योग्य बहुआयामी उपचारांनी बाल कर्करोग बरा होऊ शकतो. अशा उपक्रमांद्वारे, आम्ही केवळ जागरूकता वाढवण्याचेच नाही तर आमच्या रुग्णांच्या धैर्याचे साजरे करण्याचे उद्दिष्ट ठेवतो, जे आम्हाला दररोज त्यांच्या दृढनिश्चय आणि शक्तीने प्रेरणा देतात.”

या कार्यक्रमात देणगीदारांचा सत्कार, दीपप्रज्वलन समारंभ आणि विविध उपचारात्मक उपक्रमांचा समावेश होता. यामध्ये मुंबई कला आणि आरोग्य महोत्सवाद्वारे नृत्य चिकित्सा, मॅक्स फाउंडेशनद्वारे पुस्तक वाचन सत्र आणि मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी जादूचा कार्यक्रम यांचा समावेश होता. कार्यक्रमातील सर्वात शक्तिशाली क्षणांपैकी एक म्हणजे 'पॉवर चॅम्प्स > कॅन्सर: फ्रॉम चॅलेंज टू चेंज' बालपणी कर्करोगातून वाचलेल्या पालक आणि मुलांच्या भावनिक कथांद्वारे ही थीम जिवंत करण्यात आली. त्यांनी चिकाटी, आशा आणि परिवर्तनाचा त्यांचा प्रेरणादायी प्रवास शेअर केला. या शक्तिशाली अनुभवांवर आधारित, एक विशेष शपथविधी समारंभ आयोजित करण्यात आला




ज्यामध्ये डॉक्टर, कुटुंबे आणि उपस्थितांनी एकत्र येऊन धैर्य, लवकर निदान,प्रत्येक मुलाच्या पुनर्प्राप्तीच्या प्रवासात करुणामय काळजी आणि सतत पाठिंबा देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत आहोत.

शाश्वततेसाठी रुग्णालयाच्या वचनबद्धतेनुसार, या प्रसंगी 'ग्रो ग्रीन' उपक्रम देखील सुरू करण्यात आला. हा उपक्रम मुलांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि पृथ्वीची काळजी घेणे हे एकत्र चालते हा संदेश अधिक दृढ करतो. या उपक्रमांतर्गत, मुलांना खास डिझाइन केलेले "ग्रो ग्रीन प्लांट किट" देण्यात आले, ज्यामध्ये एक मार्गदर्शक आणि लागवडीच्या सूचनांचा समावेश होता. प्रत्येक किटमध्ये एक QR कोड होता, जो सहभागी या उपक्रमासाठी नोंदणी करण्यासाठी स्कॅन करू शकत होते. मुलांना रोपे लावण्यास, त्यांचे संगोपन करण्यास आणि त्यांचे फोटो शेअर करण्यास प्रोत्साहित करण्यात आले.

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर, त्यांना त्यांच्या योगदानाची दखल घेणारे प्रमाणपत्र मिळेल. हा उपक्रम कार्यक्रमानंतरही सुरू राहील, दीर्घकालीन सहभाग आणि सतत सहभागाला प्रोत्साहन देईल. पर्यावरणीय जबाबदारीबद्दल मुलांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि वाढ, आशा आणि पुनरुज्जीवनाचे प्रतीक म्हणून काम करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे.

मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल, क्लिनिकल उत्कृष्टता, रुग्ण-केंद्रित समर्थन प्रणाली आणि सामुदायिक जागरूकता उपक्रमांद्वारे बालरोग कर्करोग काळजी वाढविण्यात आघाडीवर आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### समर्पण आणि सेवा यातून व्यवसाय वृद्धी डॉ.श्रीपाल सबनीस

पुणे (दैनिक संध्या) : कोणतीही मिसळ चवदार असते. मात्र ती देणाऱ्यामध्ये सेवाभाव, आत्मीयता आणि प्रेम असेल, तर त्याची चव अधिकच वेगळी लागते. बेडेकर मिसळ यांचा व्यवसाय टी हाऊसपासून ते चार पिढयांपर्यंत पोहोचला आहे. आज आधुनिकता आणि परंपरा ही बेडेकर कुटुंबाने जपली असून समर्पण आणि सेवा यातून व्यवसाय वृद्धी होते हे त्यांनी दाखवून दिले आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ.श्रीपाल सबनीस यांनी व्यक्त केले. डॉ.न.म. जोशी व कुटुंबीय पुरस्कृत बल्लवाचार्य कै.म.वा. जोशी स्मृती गौरव अन्नब्रह्म पुरस्कार २०२५-२६ हा नारायण पेठेतील बेडेकर टी स्टॉल म्हणजेच बेडेकर मिसळ यांना नारायण पेठ मुंजोबाच्या बोळातील त्यांच्या वास्तूत झालेल्या कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व आयोजक डॉ.न.म. जोशी, मुरलीधर भोजनालयाचे गोपाळ तिवारी यांसह बेडेकर कुटुंबीय उपस्थित होते. बेडेकर मिसळ चे अनिल आणि आल्हाद बेडेकर यांनी पुरस्कार स्वीकारला. सन्मानपत्र, शाल, रुपये २ हजार ५०० असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराचे यंदा ३ रे वर्ष होते. गोपाळ तिवारी म्हणाले, खाद्य व्यवसायातून पुणेकरांची सेवा करणाऱ्या बेडेकर मिसळ यांचा हा सन्मान आहे. ग्राहकांप्रती असलेली सत्यता आणि गुणवत्ता जोपासणे देखील महत्वाचे असते, हे काम बेडेकर कुटुंब करीत आहे. त्यांच्या ३-४ पिढयांचे समर्पण या व्यवसायाला लाभले आहे. पुण्यातील सर्व पक्षीय नेते, कलावंत येथे नेहमी जमतात. त्यामुळे बेडेकर मिसळ हा सांस्कृतिक संवादाचा कट्टा बनला आहे. डॉ.न.म. जोशी म्हणाले, माझे वडील आचारी म्हणून काम करीत होते. त्यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्यांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. सुरुवातीला पूना गेस्ट येथे माझे वडील कार्यरत होते. त्यामुळे पूना गेस्ट हाऊस, त्यानंतर मुरलीधर भोजनालय आणि यंदा बेडेकर मिसळ यांना गौरविण्यात आले. त्याकाळी ५० पैशात मिसळ मिळत होती, असे सांगत अनेक आठवणींना त्याने उजाळा दिला, असेही त्यांनी सांगितले. संकेत देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.



### पुणे लष्कर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळ यांचा सत्कार

पुणे (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघाच्या वतीने मतदार संघाचे अध्यक्ष नरेश जाधव आणि पुणे कॅन्टोन्मेंट ब्लॉक अध्यक्ष दिनेश अर्धाळकर यांच्या हस्ते लष्कर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळ यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष दिनेश परदेशी, पुणे कॅन्टोन्मेंट सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष अतुल जाधव, रोशनारा कुरेशी, हिना शेख, उमेश परदेशी, महेश गोंडाले, ईस्तियाक बागवान, फहाद सय्यद, विक्रम पवळे आदि यावेळी उपस्थित होते.

### रेरावर सर्वोच्च न्यायालयाची कडक टिप्पणी; "उपयोग नसेल तर बंद करा"

पुणे (दैनिक संध्या) : घर खरेदीदारांच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आलेली रिअल इस्टेट रेग्युलेटरी ॲथॉरिटी (रेरा) ही संस्था घर खरेदीदारांच्या संरक्षणाची उद्देशपूर्ती करण्यात अपयशी ठरल्याचे कठोर निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदविले असून रेराच्या कार्यपध्दतीवर ताशेरे ओढले आहेत. प्रत्यक्षात घरखरेदीदारांचे संरक्षण न करता डिफॉल्ट करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांनाच मदत करते, अशी गंभीर निरीक्षणे नोंदविली आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या हित रक्षणासाठी रेरामध्ये आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. 'स्टेट ऑफ हिमाचल प्रदेश विरुद्ध नरेश शर्मा' या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जे. बागची यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी रेराच्या रचना व कार्यपद्धतीवर न्यायालयाने तीव नाराजी व्यक्त केली. 'रेरा' ही संस्था घर खरेदीदारांच्या संरक्षणासाठी स्थापन झाली असली, तरी ती उद्देशपुर्ती करण्यात ही संस्था अपयशी ठरल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

# महिला स्वबळावर उभ्या राहिल्या तर कुटुंबाचे सक्षमीकरण

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.पराग काळकर ; महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल १२५ महिलांना मोफत शिलाई मशिन

पुणे (दै. संध्या)



स्त्री सक्षमीकरण ही काळाची गरज आहे. महिला स्वतःच्या पायावर उभी राहिली, तर ती केवळ स्वतःचा विकासच नाही. तर संपूर्ण कुटुंबाचे सक्षमीकरण करते. उद्योग व्यवसायात महिला आल्यास स्वयंरोजगारातून त्या स्वतःची ओळख निर्माण करतात. स्वयंरोजगार स्वतः पुरता मर्यादित न ठेवता, त्यातून पुढचे पाऊल टाकत महिलांनी उद्योजकतेकडे वळायला हवे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.पराग काळकर यांनी व्यक्त केले.

निरंजन सेवाभावी संस्थेतर्फे राज्यातील १२५ महिलांना मोफत शिलाई मशिन वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. घोले रस्त्यावरील पं. जवाहरलाल नेहरू ऑडिटोरियम येथे आयोजित कार्यक्रमाला पुणे महानगरपालिकेच्या नगरसचिव योगिता भोसले, जागतिक वित्त क्षेत्रातील अग्रणी मार्गदर्शक आणि शिक्षणतज्ञ सीए देवेंद्र मिश्रा, निरंजन सेवाभावी संस्थेचे सचिव सीए दुर्गेश चांडक, कार्याध्यक्ष अजय झंवर, भारत वेदपाठक, अहिल्यानगरचे संस्थेचे अध्यक्ष अतुल डागा आदी उपस्थित होते.

सीए देवेंद्र मिश्रा म्हणाले, पूर्वी महिला साक्षरतेची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असे. आता आपण महिला सक्षमीकरणाची चर्चा करीत असतो. त्याकरिता महिलांमध्ये विविध प्रकारची कौशल्ये असणे आवश्यक आहे. या कौशल्याच्या आधारे महिलांचे सशक्तीकरण होउ शकते. महिला स्वतःच्या कुटुंबासोबत, गाव, देश देखील उभा करू शकते. निरंजन सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून महिलांना सशक्तीकरणाचे उत्तम कार्य होत असून यापुढे आम्ही देखील त्यांच्यासोबत कायम असू.

योगिता भोसले म्हणाल्या, जेव्हा कोणत्याही महिलेला वेगळी ओळख मिळते, तेव्हा ती केवळ महिलेपुरती रहात नाही, तर ती ओळख संपूर्ण कुटुंबाला मिळते. त्यामुळे महिला कर्तृत्ववान झाल्या तर त्या स्वतः खूप मोठ्या होऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात सीए दुर्गेश चांडक म्हणाले, महाराष्ट्रातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना रोजगार व स्वावलंबनाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने १२५ महिलांना शिलाई मशीन मोटार सह देण्यात आले. यामध्ये पुण्यासह बीड आणि अहिल्यानगर येथील महिलांचा समावेश आहे.

महिलांना स्वतः च्या पायावर उभे करण्याच्या दृष्टीने संस्था प्रयत्नशील असून शैक्षणिक क्षेत्रात देखील २५ हजार हुन अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचली असल्याचे त्यांनी सांगितले. भूषण मानधने यांनी सूत्रसंचालन केले. अजय झंवर यांनी आभार मानले.

## येत्या सोमवारी जेजुरीत सोमवती यात्रा नाही

जेजुरी (दै. संध्या)


**अमावस्येचा सूर्योदय सोमवारी नसल्याने खंडोबा पालखी सोहळा रद्द**

येत्या सोमवारी (दि.१६) अमावस्येच्या प्रारंभ सायंकाळी ५ वाजून ३३ मिनिटांनी सुरू होत असून मंगळवारी समाप्त होत आहे. सोमवती अमावस्या ही सूर्योदय काळात येत नसल्याने सोमवती उत्सव नसल्याने खंडोबा देवाचा पालखी सोहळा क-हा स्नानासाठी निघणार नसल्याचे मुख्य मानकरी इनामदार राजाभाऊ पेशवे तसेच श्री खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ खांदेकरी मानकरी मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे यांनी सांगितले आहे. रविवारी (दि.१५) महाशिवरात्री उत्सव सुरू होत आहे. या काळात मुख्य मंदिरामध्ये त्रैलोकीच्या शिवलिंग दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होणार आहे. वर्षातून एकदाच ही शिवलिंगे धार्मिक विधी व दर्शनासाठी खुली होत असल्याने पोलीस प्रशासन ,नगरपालिका , विश्वस्त मंडळ ,ग्रामस्थ ,पुजारी ,सेवेकरी मंडळाने बैठक घेत उत्सवाचे नियोजन केले आहे . सोमवारी सायंकाळी अमावस्येला प्रारंभ होत आहे . सोमवारी अमावस्या काळात सूर्योदय आला तरच हा सोमवती उत्सव गृहीत धरला जातो व खंडोबा -म्हाळसादेवीच्या उत्सव मूर्तीसह पालखी सोहळा क-हा नदीतीरावरील पापनाश तीर्थाकडे स्नानासाठी मार्गस्थ होत असतो. मात्र यावेळी अमावस्येचा सूर्योदय मंगळवारी (दि. १७) होत असल्याने पालखी सोहळा कऱ्हा स्नानासाठी निघणार नसल्याचे मुख्य मानकरी पेशवे, ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोंमणे यांनी सांगितले आहे.

## राष्ट्रीय रोइंग स्पर्धेत 'एमआयटी एडीटी'च्या भाग्यश्री घुलेची सुवर्ण कमाई

### आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या राष्ट्रीय सराव शिबिरासाठी निवड

पुणे (दै. संध्या)



आर्मी रोइंग नोड येथे नुकत्याच झालेल्या ४३व्या वरिष्ठ राष्ट्रीय रोईंग अजिंक्यपद स्पर्धेत एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी क्रीडा अकादमीची खेळाडू भाग्यश्री घुले हिने उत्कृष्ट कामगिरी करत एक सुवर्ण व एक रौप्य पदक पटकावले.

या उल्लेखनीय यशासह भाग्यश्री घुलेची आगामी आशियाई स्पर्धेच्या तयारीसाठी कर्नाटकातील बेल्लारी येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सराव शिबिरासाठी निवड करण्यात आली आहे. जपान येथे होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी हे शिबिर असणार आहे. भाग्यश्री ही एमआयटी एडीटी शिक्षण संकुलातील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुलच्या कनिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थीनी असून तिला विद्यापीठातील राष्ट्रीय रोइंग प्रशिक्षक संदीप भापकर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. भाग्यश्रीच्या या यशामुळे विद्यापीठाच्या क्रीडा क्षेत्रातील उज्ज्वल परंपरेत मानाची भर पडली आहे.

या कामगिरीनंतर एमआयटी एडीटी विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ.विश्वनाथ दा. कराड, कार्याध्यक्ष तथा प्र.कुलपती प्रा. डॉ.मंगेश कराड, माईर्स शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ.स्वाती चाटे-कराड, कुलगुरू डॉ.राजेश एस., कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभाग संचालक प्रा. पद्माकर फड, माईर्स एमआयटी गुरुकुलच्या प्रकल्प संचालक डॉ. ज्योती जोटवानी, एमआयटी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.रिपल शर्मा यांनी या यशाबद्दल भाग्यश्रीचे अभिनंदन करत तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. तिच्या कामगिरीमुळे विद्यापीठातील तसेच राज्यातील युवा खेळाडूंना निश्चितच प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# मुठा नदी पात्र स्वच्छतेने साजरा झाला 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' उपक्रम

## वर्शिप अर्थ फाउंडेशन सह विविध संस्थांचा सहभाग : ५ हजार पुणेकरांचा सहभाग : मुळा मुठा पुरस्काराचे देखील वितरण

पुणे (दै. संध्या)



स्वच्छ पुणे हा युवकांचा संकल्प... स्वच्छतेची सुरुवात युवकांकडून... स्वच्छ पुणे संकल्प २०२६... असे फलक हाती घेत युवकांनी मुठा नदीच्या संवर्धनासाठी व पर्यावरणाबाबत जनजागृती केली. नदीपात्रात स्वच्छता मोहीम राबवत ५ हजार पुणेकरांनी 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' उपक्रमात सहभाग घेत व्हॅलेंटाईन डे साजरा केला. निमित्त होते, वर्शिप अर्थ फाउंडेशन तर्फे राबविण्यात येणाऱ्या 'माय रिव्हर माय व्हॅलेंटाइन' या उपक्रमाचे. भिडे पूल परिसर, नवी पेठ, मुठा नदी पात्र येथे हा उपक्रम राबविण्यात आला. यंदा उपक्रमाचे ६ वे वर्ष होते. सामाजिक कार्यकर्ते शामाला देसाई यांना यंदाचा मुळा मुठा पुरस्कार प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांसह वर्शिप अर्थ फाउंडेशनचे संस्थापक पराग मते आदी उपस्थित होते. या उपक्रमामध्ये शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना तसेच मोठ्या संख्येने पुणेकर नागरिक सहभागी झाले होते. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. फाउंडेशनच्या आम्रपाली चव्हाण, समीर पौलस्ते, दिनेश कदम, विद्यार्थी प्रतिनिधी हार्दिक सोनवणे,दुर्गेश बलके, कौस्तुभ येवले, ओंकार घुले यांसह सर्व कार्यकर्त्यांनी उपक्रमासाठी मेहनत घेतली. ज्याप्रमाणे अजित पवार सकाळी लवकर उठून आपल्या कामाला सुरुवात करत होते, त्याच पद्धतीने सकाळी मुठा स्वच्छता अभियान राबवत तरुणांनी त्यांना आगळीवेगळी आदरांजली अर्पण केली. पुणे महानगरपालिका, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, सीबीसी – सेंट्रल ब्युरो ऑफ कम्युनिकेशन (भारत सरकार), एनएसएस विभाग तसेच 'माय भारत' – युवा व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने राबविण्यात आला. नदी स्वच्छता मोहीम, रील्स स्पर्धा, सांस्कृतिक सादरीकरणे तसेच पर्यावरण जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरण जपण्याचा अनुभव मिळावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

पराग मते म्हणाले, नदी स्वच्छतेसाठी केवळ एकदिवसीय मोहिमा पुरेशा नाहीत. म्हणूनच आम्ही शिपको कंपनीच्या सहकार्याने मुठा नदीमध्ये 'ट्रॅश बूम' ही शाश्वत व प्रभावी यंत्रणा कार्यान्वित केली आहे. या प्रणालीमुळे नदीत वाहून येणारा प्लास्टिक कचरा, निर्माल्य, फुले, नारळ तसेच इतर तरंगणारा कचरा अडवून त्याचे नियोजनबद्ध संकलन करता येते. 'ट्रॅश बूम' ही नदी स्वच्छतेसाठी दीर्घकालीन उपाययोजना असून, यामुळे नदीचे सौंदर्य आणि आरोग्य दोन्ही जपले जाईल.

# कॅमेरे बसवण्याची नागरिकांची मागणी

## कोरेगाव मूळ हद्दीत गेले काही दिवसापासून सतत चोऱ्या




उरुळी कांचन (दै. संध्या)

उरुळी कांचन पोलीस स्टेशन हद्दीतील कोरेगाव मूळ ग्रामपंचायत हद्दीत गेले काही दिवसापासून चोऱ्यांचे सत्र चालूच असल्याने परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरणात निर्माण झाले आहे .

कोरेगाव मूळ (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इनामदार वस्ती परिसरात शुक्रवार (ता. १३ फेब्रुवारी) रोजी रात्री

काही ठिकाणी घरफोड्या झाल्या असल्याच्या घटना सकाळी उघडकीस आल्या. या घरफोडी मध्ये बंद असलेले घरे फोडली असल्याचे माहिती समोर आली आहे. यावेळी स्वप्निल कानकाटे यांनी सांगितले की आमचे बंद घर फोडून काही मौल्यवान वस्तू चोरून नेल्या व कपाटातील सामान अस्तवेस्त फेकून दिले होते.

ता. १३ फेब्रुवारी रोजी मध्य रात्री इनामदार वस्ती परिसरात एका कॅमेरात हत्यार बंद आठ चोरांची टोळी दिसत असुन त्यामधे चोरांनी मोठी काहीतरी जड वस्तू चोरी करून घेऊन जाताना दिसत आहे. कोरेगाव मूळ परिसरात एवढे हत्यार बंद चोर कॅमेऱ्यामध्ये कैद झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

या हत्यार बंद चोरांनी इनामदार वस्ती परिसरात काही ठिकाणी घरफोड्या करून काही मौल्यवान ऐवज चोरून नेला असल्याची माहिती समोर येत आहे. चोर चोरी करत असताना पहाटे परिसरातील नागरिकांना चोरांची चाहूल लागल्याने चोर त्या ठिकाणाहून पळून जात असताना भिंतीवरून उडी मारताना चोरांची एक बॅग खाली पडली त्या बॅगेत कोकरी, चाक, पकड, पाहने, कात्री , बॅटरी, हातमोजे, कटर, तोडांचे मास्क, स्क्रू ड्रायव्हर, बुट, चप्पल अशा वस्तू आढळून आल्या. तसेच तीन दिवसांपूर्वीच रात्री श्रीनिवास सोसायटीतील एक रिक्षा चोरी गेली. तसेच परिसरात काही दिवसापासून किरकोळ चोऱ्यांचे सत्र चालूच असून त्यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीपंपाची केबल, पत्रा शेड फोडून शेती अवजारे, शेतकऱ्यांचे पाळीव प्राणी दोन शेळ्या, दोन मेंढ्या, बंगल्याचे बांधकाम चालू असलेल्या घराचे वायरिंग, क्रेन च्या बॅटऱ्या, अशा अनेक चोऱ्या कोरेगाव मूळ परिसरात काही दिवसापूर्वी घडल्या असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे. कोरेगाव मूळ परिसरातील चोऱ्यांचे सत्र काही थांबेना.

> चोरी व खुणाचा प्रकार झाल्याने आम्ही ग्रामपंचायतीला परीसरात सीसीटीव्ही बसवण्यासाठी अनेक वेळा मागणी केली आहे पण अद्याप कॅमेरे बसले नाहीत.
> **- पोलीस पाटील, कोरेगाव मूळ**

> कोरेगाव मुळ ग्रामपंचायतीच्या हद्दीत ग्रामपंचायतीचे सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने परिसरात चोऱ्यांचे प्रमाण जास्त वाढले आहेत.
> **- सुदर्शन कानकाटे- ग्रामस्थ कोरेगाव मूळ**

> दोन महिन्यापूर्वीच ग्रामपंचायतीने सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याबाबत ठराव करून कॅमेरे बसवण्यासाठी कॉन्टॅक्टर पण नेमलेला पण अद्याप चौका चौकात कॅमेरे बसले नाहीत.
> **- विठ्ठल शितोळे - ग्रा. सदस्य कोरेगाव मूळ**

## मासिक पाळी तसेच आरोग्य जनजागृती शिबिर उत्साहात संपन्न



जेजुरी (दै. संध्या)

सामाजिक उत्तरदायित्व निधी अंतर्गत इंटरनॅशनल असोसिएशन फॉर ह्युमन व्हॅल्यूज आणि हायकल लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिजामाता हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, जेजुरी येथे मासिक पाळी आरोग्य व स्वच्छता जनजागृती अभियानांतर्गत तीन दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. ११ ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत हे शिबिर उत्साहात पार पडले.

शिबिरात किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिल्या तुकडीत ९० विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची काळजी, वैयक्तिक स्वच्छता, संतुलित आहार, शारीरिक व मानसिक बदल तसेच सामान्य समस्या व त्यावरील उपाय याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. आरोग्य प्रतिनिधी सारिका शेलार यांनी योगाभ्यास, हस्तमुद्रा व ध्यान यांचे प्रात्यक्षिक दाखवून मार्गदर्शन केले. खुल्या चर्चेमुळे विद्यार्थिनींना शंका निरसनाची संधी मिळाली व त्यांचा आत्मविश्वास वाढला.

या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक विद्यार्थिनीला आरोग्य विषयक मोफत किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये मासिक पाळीदरम्यान वापरले जाणारे सॅनिटरी पॅड, डेटॉल हॅण्डवॉश, स्वच्छता रुमाल, निर्जंतुकीकरण द्रावण तसेच वैयक्तिक स्वच्छतेसाठी आवश्यक माहिती असणारे ब्रॉशर या वस्तूंचा समावेश होता. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता वाढण्यास मोठी मदत झाली. प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे तसेच आरोग्य विभाग प्रमुख सीमा राणे यांनी संबंधित संस्थांचे मनःपूर्वक आभार मानले. या शिबिरामुळे विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीविषयी योग्य दृष्टीकोन निर्माण झाला असून स्वच्छतेबाबत जागरूकता वाढल्याची भावना व्यक्त करण्यात आली. शिबिराचे नियोजन पर्यवेक्षिका लीना पायगुडे, शाळा समन्वयक प्रल्हाद गिरमे, सोमनाथ उबाळे, राजाराम पिसाळ,अजय जगताप,माध्यमिक विभाग प्रमुख बाळासाहेब जगताप,सोनबा दुर्गाडे ,जूनियर विभाग प्रमुख किरण मोडक, मयूर शिंदे, राघू हारुळे,राजेंद्र ताम्हाणे,योगेश घोरपडे,गणेश भंडलकर, कुलदीप साळवे,अमित सागर,महेश खाडे,पांडुरंग आटोळे,कैलास सोनवणे यांनी केले.